POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२०७ ● मुंबई, गुरुवार, २७ फेब्रुवारी २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### कुंभमेळ्यावरुन महायुतीत कोल्ड वॉर?

- काही दिवसांपूर्वी गिरीश महाजन यांनी कुंभमेळ्याच्या आयोजनाबाबत एक बैठक घेतली होती. या बैठकीला मंत्री दादा भुसे अनुपस्थित होते.
- तर १४ फेब्रुवारीला एकनाथ शिंदेंनी घेतलेल्या बैठकीत गिरीश महाजन गैरहजर होते
- भाजपच्यी बैठकीची तयारी करायची होती त्यामुळे गैरहजर असल्याचं स्पष्टीकरण गिरीश महाजन यांनी त्यावेळी दिलं होतं...

**देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत कोणत्या विषयांवर चर्चा झाली.. त्यावर एक नजर टाकुयात...**

**महाकुंभबाबत बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे -**

- गेल्या कुंभमेळ्यापेक्षा ५ पट भाविक येतील हे गृहीत धरून नियोजन
- प्रयागराज महाकुंभला भेट देऊन आलेल्या अधिकाऱ्याकडून व्यवस्थेचे सादरीकरण
- नियोजन आणि समन्वयासाठी प्रशासन कुंभ प्राधिकरण स्थापन करणार
- कुंभमेळाबाबतचे विधेयक अधिवेशनात मांडलं जाणार
- अकचा अधिकाधिक वापर करावा, तंत्रज्ञान महाकुंभ असं स्वरूप द्यावं
- संपूर्ण नियोजनात शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि पोलिसांनी सौजन्य पाळावे
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रशासनाला निर्देश

**२०२७ मध्ये नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा असणार आहे. दरम्यान या कुंभमेळ्याला देशभरातील लाखो भाविकांची नाशकात मोठी गर्दी होणार आहे.**



## फडणवीसांनी घेतलेल्या बैठकीत दोन्ही उपमुख्यमंत्री गैरहजर
# महायुतीत कोल्ड वॉर सुरु आहे का?

**■मुंबई।प्रतिनिधी :** नाशिकच्या कुंभमेळ्यावरुन महायुतीत कोल्ड वॉर सुरु आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कारण आज फडणवीसांनी घेतलेल्या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची गैरहजेरी होती. तर काही दिवसांपूर्वी शिंदेंनी घेतलेल्या बैठकीत गिरीश महाजनांनी देखील दांडी मारली होती.

- नाशिक कुंभमेळ्याच्या तयारीसाठी फडणवीसांच्या उपस्थितीत बैठक
- बैठकीला एकनाथ शिंदे, अजित पवारांची गैरहजेरी
- दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या गैरहजेरीमुळे राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण

नाशिकमधील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. दरम्यान या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी गैरहजेरी लावली होती. यामुळे राजकीय वतुर्ळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदेंनी कुंभमेळासंदर्भात नाशकात घेतलेल्या बैठकीला गिरीश महाजन देखील उपस्थित नव्हते.

### पालकमंत्रीपदाला देण्यात आली होती स्थगिती

रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रीपदावरून वाद सरू होता, महायुतीच्या नेत्यांमदध्ये धूसफूसही सुरू होती. त्यामुळे जानेवारी महिन्यात नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रीपदाला राज्य सरकारकडून स्थगिती देण्यात आली होती. अदिती तटकरे यांच्या निवडीला शिवसेनेकडून ( शिंदे गट) विरोध झाला. तर नाशिकमध्येही दादा भुसे यांना डावलण्यात आल्याने शिवसैनिकांमध्ये नाराजीचं वातावरण होतं. नाशिकमध्ये पालकमंत्रीपदावरून भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेत रस्सीखेच सुरू होती. दादा भुसे यांना डावलून गिरीश महाजन यांना नाशिकचं पालकमंत्रीपद दिल्याने कार्यकर्ते नाराज होते.

### नाशिकच्या पालकमंत्री पदावर भाजपचा दावा कायम

मात्र भाजपने गेल्या अनेक दिवसांपासून नाशिकच्या पालकमंत्रीपदावर दावा कायम ठेवला होता. आणि आता अखेर भाजपाकडेच नाशिकचं पालकमंत्री पद राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. 2 वर्षानंतर सिंहस्थ कुंभमेला होणार असून, त्याअनुषंगाने सर्व तयारीसाठी भाजप हा पालकमंत्री पद स्वतःकडेच ठेवणार असल्याचं समजतं. गिरीश महाजन यांना नाशिकचं पालकमंत्रीपद देण्यात येणार आहे. पण रायगडच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी बसून हा तिढा सोडवावा अशा सूचना दिल्लीतील बाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे. मागील अनेक दिवसांपासून रायगडच्या पालकमंत्रपदावरून तिढा निर्माण झाला होता. रायगडमध्ये शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद सुरू होता. अदिती तटकरे यांचं नाव जाहीर झाल्यानंतर भरत गोगावलेंकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती.

## बीड प्रकरणी फडणवीस सरकारचा मोठा निर्णय
# उज्ज्वल निकम लढणार खटला

**■बीड।प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्या प्रकरणी वकील उज्ज्वल निकमांची नियुक्ती करण्यात आलीय. तसंच सुरेश धसांच्या शिष्टाईनंतर मस्साजोगच्या ग्रामस्थांनी अन्नत्याग आंदोलन मागे घेतलं आहे. दरम्यान मागण्या मान्य केल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा गावकऱ्यांनी दिलाय. लेखी आश्वासनानंतर संतोष देशमुख हत्याप्रकरणी सुरु केलेलं अन्नत्याग आंदोलन मागे घेण्यात आलंय. सुरेश धस यांच्या शिष्टाईनंतर मस्साजोग ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतलाय. परत तुमच्यावर आंदोलन करण्याची वेळ येऊ देणार नाही असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

दरम्यान गावकऱ्यांनी केलेल्या ७ प्रमुख मागण्यांपैकी



१ मागणी सरकारनं पूर्ण केलीय. संतोष देशमुख हत्येचा खटला उज्ज्वल निकम यांच्याकडे सोपवण्यात आलाय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत ही माहिती दिली आहे. त्यानंतर उज्ज्वल निकम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

### मस्साजोगमधील गावकऱ्यांनी केलेल्या सात मागण्या कोणत्या?

- केजचे तत्कालीन ढकप्रशांत महाजन व ढकराजेश पाटील यांना बडतर्फ करुन सहआरोपी करा.
- फरार आरोपी कृष्णा आंधळेला अटक करा
- सरकारी वकील म्हणून उज्जवल निकम यांची नियुक्ती. ही मागणी मान्य करण्यात आलीय
- सदरील प्रकरण जलदगती न्यायालयात चालवणे.
- वाशी पोलीस स्टेशनचे ढरकघुले, पो.कॉ. दिलीप गित्ते, गोरख व दत्ता बिक्कड, हेड कॉ. यांचे उऊफ्रतपासून यांना सहआरोपी करा.
- आरोपींना फरार करण्यास मदत करणारे संभाजी वायबसे दांपत्य, बालाजी तांदळे, संजय केदार, सारंग आंधळे यांची चौकशी करुन यांना तात्काळ सहआरोपी करावे.

### संतोष देशमुख यांच्या कुटुंबाचं अन्नत्याग आंदोलन मागे, आता नवी डेडलाईन

संतोष देशमुख यांच्या कुटुंबाने अन्नत्याग आंदोलन मागे घेतलं आहे. अन्नत्याग आंदोलनात आम्ही कुटुंबीय सहभागी झालो होतो, ज्या काही आमच्या मागण्या होत्या, सरकारी वकिलांची नियुक्ती असेल किंवा इतर काही मागण्या होत्या. त्याची पूर्तता करण्यासाठी त्यांनी काही वेळ मागितला आहे. चार-पाच दिवसांचा वेळ त्यांनी मागितला आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात हे आंदोलन स्थगित करण्यात येत आहे. त्याननंतर गावकरी जी दिशा ठरवतील तसं आपण करू असं संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, मागण्यासंदर्भात चर्चा झाली आहे, पुढील काही दिवसांमध्ये आमच्या मागण्या पूर्ण होतील अशी अशा मी बाळगतो. आंदोलन किती दिवस स्थगित राहणार याबाबत अजून कोणतीही तारीख जाहीर केलेली नाही. पुढील निर्णय ग्रामस्थ घेतील, त्यात मी सहभागी असेल. दरम्यान आज या आंदोलनाला भाजप आमदार सुरेश धस यांनी देखील भेट दिली यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं की काही गोष्टी फक्त मला आणि धनंजय देशमुख यांनाच माहिती आहेत, याबाबत धनंजय देशमुख यांना विचारलं असता, त्यावर मी आज बोलणार नाही, कारण त्या गोष्टी लिक नाही झाल्या पाहिजेत. त्यावर नंतर सविस्तर बोलेल असं त्यांनी म्हटलं आहे. आज आंदोलन मागे घेण्यात आलं आहे, यावर संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. प्रशासनाने वेळ मागितला आहे, त्यामुळे हे आंदोलन काही काळापुरतं स्थगित करण्यात आलं आहे. आम्ही दहा तारखेपर्यंत प्रशासनाला वेळ दिला आहे. पोलीस प्रशासनाने अद्यापही एसपीकडे किंवा ॲडिशनल एसपीकडे तपास वर्ग केलेला नाही. त्यासाठी वेळ मागण्यात आला आहे. आम्हाला वेळ द्या, आम्ही चौकशी करू नंतर तुमच्या ज्या मागण्या असतील त्या आम्ही पूर्ण करू, असं त्यांनी म्हटलं आहे. त्यासाठी आता दहा मार्चपर्यंत वेळ देण्यात आला आहे, त्यानंतर पुढील निर्णय घेऊ असं वैभवी देशमुख यांची म्हटलं आहे.

# अमरावतीत अंधश्रद्धेचा कळस!
## पोटफुगीवर उपचार म्हणून पोटावर ६५ चटके दिले, २२ दिवसांचे बाळ...

**■मुंबई।प्रतिनिधी :** अमरावतीच्या मेळघाटात अंधश्रद्धेच्या नावावर अघोरी कृत्यं केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. चिखलदरा तालुक्यातील सिमोरी गावातील २२ दिवसाच्या बाळाला घरगुती उपाय म्हणून विळा तापवून ६५ वेळा चटके दिले आहेत. हृदयाचा थरकाप उडवणाऱ्या या घटनेने संपूर्ण गाव सून्न झाले आहे.

दरम्यान या घटनेने मेळघाटातील आदिवासींचा अजूनही आरोग्य यंत्रणेवर विश्वास नसल्याचा स्पष्ट होत असून मेळघाटातील आदिवासी अजूनही अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन घरगुती उपाय करत असल्याचे दिसून येत आहे. अमरावतीच्या मेळघाटात असे प्रकार अनेकदा घडत असतात. आदिवासींचा आरोग्य प्रशासनावर विश्वास नाहीये. त्यामुळं ते तांत्रिक किंवा मांत्रिकाकडे जावून अघोरी उपचार करुन घेतात. मात्र हेच उपचार कधीकधी अंगलट येतात आणि जीवावर बेततात.



पोटफुगीवर २२ दिवसाच्या बाळाला घरगुती उपाय म्हणून विळा तापवून ६५ वेळा चटके दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा अतिदुर्गम मेळघाटात अंधश्रद्धेचा कळस पाहायला मिळत आहे. या प्रकारामुळे २२ दिवसीय बाळाची प्रकृती बिघडल्याने त्याला नातेवाईकांनी सिमोरी गावावरून हातरू प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नेण्यात आले होते. मात्र बाळाची गंभीर प्रकृती पाहता येथून अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले मात्र बाळ अति गंभीर असल्याने अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाने या बाळाला अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात रेफर केले आहे. सध्या या बाळावर अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयात उपचार सुरू आहे.

सिमोरी गावातील बेबी राजू धिकार यांना २२ दिवसांचे बाळ आहे. या बाळाला पोटफुगीसारखा आजार झाल्याने नातेवाईकांनी त्याच्या पोटावर विळा गरम करुन तब्बल ६५ वेळा चटके दिले आहेत. मात्र त्यानंतर बाळाचा प्रकृती खालावल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# कॉपीमुक्त परीक्षेचा तहसीलदाराकडूनच फज्जा, कॉप्या देताना रंगेहात पकडला गेला

**■हिंगोली।प्रतिनिधी :** अहिल्यानगर मध्ये बारावीच्या परीक्षा केंद्रावर कॉपी पुरवल्याची घटना घडलीय. बारावीच्या विद्यार्थ्यांना कॉपी पुरवताना नायब तहसीलदाराला रंगेहाथ पकडण्यात आले आहे. ही घटना अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील परीक्षा केंद्रावर घडली आहे. या घटनेमुळे परीक्षा केंद्रावर एकच खळबळ उडाली. कॉपी पुरवतानाचा नायब तहसीलदाराचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. नायब तहसीलदाराचे नाव अनिल तोडमल आहे.




नायब तहसीलदार अनिल तोडमल यांचा मुलगा बारावीत आहे. सध्या बारावीची परीक्षा सुरु आहे. अशातच मुलाला मदत म्हणून नायब तहसीलदार पाथर्डीमधील बारावीच्या परीक्षा केंद्रावर पोहोचले. पेपर सुरु झाल्यानंतर त्यांनी मुलाला कॉपी देण्याचा प्रयत्न केला. परंतु, याचवेळी त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. तहसीलदार स्वतःच्याच मुलाला कॉपी पुरवत असल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. पाथर्डी तालुक्यातील तनपूरवाडी या परीक्षा केंद्रावर ही घटना घडली असून या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी परीक्षा केंद्र गाठले. आता संबंधित नायब तहसीलदार अनिल तोडमल यांच्यावर आता काय कारवाई केली जाणार याकडे आता सर्वंचे लक्ष लागून राहिले आहे.

### राज्यभरात ४२ कॉपीच्या घटना


बारावीच्या परीक्षा सुरु झाल्यापासून अनेक ठिकाणी कॉपीच्या घटना घडताना दिसत आहेत. बारावी बोर्डाच्या परीक्षेच्या पहिल्याच दिवशी राज्यभरातून ४२ कॉपीच्या घटना समोर आल्या होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनाची गांभीयार्ने दखल घेतली असून 'कॉपीमुक्त परीक्षा' उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागासह इतर विभागही आता या प्रकरणी सरसावले आहेत. राज्यभरात ४२ पैकी २६ कॉपी प्रकरणे ही छत्रपती संभाजीनगर विभागातील आहेत. तर आठ प्रकरणे ही पुण्यातील आहेत. ज्यामध्ये ९ पैकी ६ विभागातील १९ परीक्षा केंद्रावर कॉपीच्या घटना घडल्या आहेत. तर कोकण, मुंबई आणि कोल्हापूर या विभागातील परीक्षा केंद्रांवर कोणत्याही कॉपीच्या घटना घडल्या नाहीत. अशी माहिती राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली आहे.

# गरज असेल तरच घराबाहेर पडा
## मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरीत उष्णतेच्या लाटेचा गंभीर इशारा

**■मुंबई।प्रतिनिधी :** एप्रिल आणि मे महिना अद्यापही दूर असतानाच महाराष्ट्रासह देशाच्या बहुतांश भागांमध्ये ऊन्हाच्या झळा तीव्र होण्यास सुरुवात झाली आहे. मध्य प्रदेश, राजस्थान इथं फेब्रुवारीपासूनच कमाल तापमानात सातत्यानं वाढ होताना दिसत असून, महाराष्ट्रातून हिवाळा हद्दपार होऊन त्याची जागा केव्हाच उन्हाळ्यानं घेतली आहे. फेब्रुवारीतच तापमानाचा आकडा ३८ अंशांपर्यंत पोहोचल्यामुळं यंदाचा मे महिना आणखी किती तापदायक असणार या भीतीनंच नागरिकांना धडकी भरत आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढील २४ तासांमध्ये पश्चिम महाराष्ट्रात उन्हाचा तडाखा चांगलाच जाणवणार आहे. तर, कोकण आणि नजीकच्या भागामध्ये उष्ण आणि दमट हवामानाची स्थिती असून, इथं यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातही उकाडा वाढत असून, सूर्य डोक्यावर आल्यानंतर आता अनेक भागांमध्ये घराबाहेर पडणं कठीण होताना दिसत आहे. उत्तर महाराष्ट्र मात्र इथं काही प्रमाणात अपवाद ठरत असून, इथं अद्यापही पहाटेच्या वेळी काही जिल्ह्यांमध्ये गारठा जाणवत आहे. दिवस पुढे सरकल्यानंतर मात्र इथंही कमाल आणि किमान तापमानात वाढ होताना दिसत आहे.

हवामान तज्ज्ञ के.एस.होसाळीकर यांच्या माहितीनुसार २५ आणि २६ फेब्रुवारी या दोन दिवशी राज्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. २५ फेब्रुवारीला प्रामुख्यानं मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी इथं; तर २६ फेब्रुवारी रोजी पालघर इथं उष्मा वाढणार असून, उष्णतेची लाट येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात येत्या काही दिवसांमध्ये तापमानवाढ कायम राहील असा इशारा देण्यात आला असल्यानं नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी अशाही मार्गदर्शक सूचना यंत्रणेकडून जारी करण्यात आली आहे.




### पर्वतीय क्षेत्रांवर अद्यापही तापमानवाढीचा परिणाम नाही

केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार उत्तराखंड आणि हिमाचल प्रांतासह अरुणाचल प्रदेश, मेघालय इथं आकाश निरभ्र असेल. जम्मू काश्मीरमध्ये पुढील 48 तासांमध्ये पावसाचा हलका शिडकावा होऊ शकतो. तर, फेब्रुवारीअखेरीस हिमाचल प्रदेशातही पावसासह हिमवृष्टीचा इशारा जारी करण्यात आला आहे.

## बारामती, बीडला प्रत्येकी ५६४ कोटी अन्...
# फडणवीस सरकारचे ७ महत्त्वाचे निर्णय

**■मुंबई।प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमंडळाची आज मंत्रालयामध्ये बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सचिवालयाने या निर्णयांची माहिती जारी केली आहे. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांमध्ये दोन नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालयांना मंजुरी देण्याबरोबरच एका बँकेसंदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे.मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क कक्षाने मंगळवारी दिनांत २५ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या बैठकीमधील



निर्णयांचा संक्षिप्त आढावा घेणारी सात निर्णयांची यादी जारी केली आहे. यामध्ये वित्त विभागाने सार्वजनिक उपक्रम, महामंडळांना ठाणे जनता सहकारी बँकेत खाती उघडण्यास परवानगी देण्याच्या महत्त्वाच्या निर्णयाचाही समावेश आहे. याशिवाय पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावांसाठी मोठी आर्थिक मदत देण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला आहे.

### मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीमध्ये कोणते निर्णय झाले हे संक्षिप्त स्वरुपात पाहूयात...

- पौड, ता. मुळशी, जिल्हा पुणे येथे लिंक कोर्टऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्यास मान्यता. (विधी व न्याय विभाग)
- ठाणे जनता सहकारी बँकेत सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांना खाते उघडण्यासाठी परवानगी. (वित्त विभाग)
- 1976 पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय; अशा 332 गावठाणासाठी 599.75 कोटी रुपये मंजूर. (मदत व पुनर्वसन विभाग)
- महाराष्ट्र राज्य आधारसामग्री (डेटा) धोरणास मान्यता; राज्य डेटा प्राधिकरण स्थापन करणार. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती. (नियोजन विभाग)
- बारामती जिल्हा पुणे येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपये मंजूर. (कृषि व पदुम विभाग)
- परळी, जिल्हा बीड येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपये मंजूर. (कृषि व पदुम विभाग)
- महाराष्ट्र महामार्ग अधिनियम कलम 18(3) 1955 मध्ये सुधारणा, तसेच महाराष्ट्र महामार्ग अध्यादेश २०२५ ला मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग)

# मंत्रालयाच्या सुरक्षा जाळीवर उडी घेत युवकाचं आंदोलन, इंकलाब जिंदाबादच्या घोषणा

**■मुंबई।प्रतिनिधी :** मंत्रालयाच्या सुरक्षा जाळीवर एका युवकाने उडी घेत आंदोलन सुरु केलं आहे. युवकानं सुरक्षा जाळीवर उडी मारल्यानंतर पोलिसांनी देखील जाळीवर उड्या घेत त्या युवकाला ताब्यात घेतलं आहे. इंकलाब जिंदाबादच्या घोषणा हा युवक देत आहे. यावेळी युवकाच्या हातात इंकलाब जिंदाबाद लिहलेली पत्रके होती. ही पत्रके देखील परिसरात फेकण्यात आली आहेत. मंत्रालयात पुन्हा




एकदा सुरक्षा जाळीवर उडी घेत एका युवकाने आंदोलन केलं आहे. आंदोलकाने सुरक्षा जाळीवर उडी मारल्यानंतर एकच खळबळ उडाली. आंदोलकाने सुरक्षा जाळीवर उडी मारल्यानंतर पोलिसांनी धाव घेतली. पोलिसांनीही सुरक्षा जाळीवर उड्या मारत आंदोलकाला ताब्यात घेतलं. मंत्रालयात तरुणाने कोणत्या कारणासाठी आंदोलन केलं, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. पोलिसांच्या चौकशीनंतर महत्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

### पोलिसांचा मोठा फौजफाटा दाखल

आंदोलन करणाऱ्या युवकानं सातव्या मजल्यावरुन सुरक्षा जाळीवर उडी घेतली आहे. महसूल खात्यासंदर्भात तक्रार देखील या युवकाने आणली होती. युवकाने जाळीवर उडी घेतल्यानंतर मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. तसेच पोलिसांचा मोठा फौजफाटा देखील याठिकाणी दाखल झाला. अधिकारी देखील दाखल झाले होते. दरम्यान, मंत्रालयात वारंवार अशा घटना घडत आहेत. संपूर्ण मंत्रालयाचा जाळी लावली आहे. कोणत्या प्रकारचा अनर्थ घडू नये यासाठी सुरक्षा जाळी लावण्यात आली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मंत्रालयात आत्मदहनाचा प्रयत्न करण्याचे प्रकार वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रशासन देखील सतर्क झालं आहे. अशा वेळी कोणताहगी अनर्थ टळू नये म्हणून मंत्रालयात संरक्षण जाळी लावण्यात आली आहे. तरीदेखील या जाळीवर उडी घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशीच आजही घटना घडली आहे.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## अखिल भारतीय बदनामी!

देशाची राजधानी दिल्लीत पार पडलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये ज्यांनी राजकीय चिखलफेक केली, त्यांनी उभ्या महाराष्ट्राला अक्षरशः लाज आणली आहे. खरे तर २०१९ साली महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात अशी काही राजकीय उलथापालथ झाली की, त्यामुळे कोण गोरे आणि कोण काळे असा भेद करणेही मुश्किल झाले आहे. पक्षनिष्ठा हा प्रकार तर पार धुळीस मिळालेला सगळ्यांनी पाहिला. त्यामुळे पक्षनिष्ठा आणि राजकीय विचारसरणी यापेक्षा सत्ता आणि पद हे कसे श्रेष्ठ ठरते हे दिसून आले. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष फुटले आणि त्यांच्या मूळ पक्षप्रमुखांना बेदखल करण्यात आलेले महाराष्ट्रातील जनतेने पाहिले. त्यामुळे जे पक्षाचे मूळ प्रमुख होते, त्यांची अवस्था असून खास मालक घरचा म्हणती चोर त्याला, अशी झाली. त्यांच्याकडे पक्षाचे नावही राहिले नाही आणि चिन्हही राहिले नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचे दोन तुकडे झाले. त्यामुळे दोन्ही गटात घमासान टीका सुरू आहे. त्याचे पडसाद दिल्लीत झालेल्या मराठी साहित्य संमेलनात उमटले. या संमेलनात 'असे घडलो आम्ही', या विषयावर विविध मान्यवरांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यात राज्यातील विधान परिषदेच्या उपसभापती नीमल गोऱ्हे यांची मुलाखत झाली. त्यावेळी त्यांनी पूर्वी ज्या पक्षात होत्या, त्या पक्षाच्या प्रमुखांबद्दल वाद निर्माण होईल, असे विधान केले. खरे तर नीलम गोऱ्हे या उच्चशिक्षित आहेत. शिवसेनेच्या माध्यमातून राजकारणात येण्यापूर्वी त्यांनी स्त्री आधार केंद्राच्या माध्यमातून मोठे सामाजिक कार्य केलेले आहे. त्या उत्तम लेखिका आणि वक्त्या आहेत. असे सगळे असताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याविषयी जे विधान केले, त्यामुळे स्वतःचा लौकिक तर घालवलाच आहे, पण त्याच वेळी महाराष्ट्रातील मराठी लोक आणि तिथले राजकारण याचीही लक्तरे सगळ्या देशासमोर टांगली. आपण कुठल्या व्यासपीठावरून बोलत आहोत, याचे भान नीलम गोऱ्हे यांना राहू नये, हे खरेच धक्कादायक आहे. नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांना उद्देशून केलेल्या वादग्रस्त विधानानंतर उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी शेलक्या विशेषणांचा वापर करून त्यांचा समाचार घेतला. इतकेच नव्हे तर त्यांनी मराठी संमेलनाचे आयोजन करणाऱ्या मराठी साहित्य महामंडळावर आक्षेपार्ह आरोप केले. साहित्य संमेलनात कुणी काय बोलावे, याची साहित्य महामंडळ आचारसंहिता तयार करू शकत नाही. कारण तसे केले तर वक्त्यांच्या किंवा चर्चेत सहभागी होणाऱ्यांच्या विचार आणि व्यक्तीस्वातंत्र्यावर घाला घातल्यासारखे होईल. पण आपण कुठल्या व्यासपीठावरून बोलत आहोत, याचे भान बोलणाऱ्याने ठेवायला हवे. जेव्हा सत्तर वर्षांपूर्वी अखिल भारतीय मराठी संमेलन दिल्लीत झाले तेव्हा पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू त्याला उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटक होते. ज्या संमेलनाला खुद्द पंतप्रधान उद्घाटक म्हणून उपस्थित राहतात ही त्या राज्याच्या आणि भाषिकांच्या दृष्टीने अत्यंत सन्मानाची बाब असते. पण एकमेकांविषयी राजकीय द्वेषाने पेटलेल्या नेत्यांनी गल्लीतील राग दिल्लीत जाऊन काढला. पोलिसांना १०० कोटी रुपये वसूल करण्याचे आदेश देण्यात आल्याचे प्रकरण राज्यात गाजत असताना, अशा लोकांच्या मूळ सूत्रधारांपर्यंत पोहोचायला हवे, अशी मागणी देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. याला उत्तर देताना संजय राऊत म्हणाले होते की, 'राजकारणात पैसा कुठून येतो हे फडणवीसांना माहीत नाही का, हमाम मे सब नंगे'. पण आता महाराष्ट्रातील पक्षीय फोडाफोडी आणि पदांसाठीची चढाओढ यामुळे वातावरण इतके संघर्षमय झालेले आहे की, कुणीही कुणाचे कपडे फाडायची संधी सोडत नाही. पण हे कपडे फाडल्यामुळे लाज सगळ्यांची जात आहे, याचे भानही अनेकांना राहिलेले नाही. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यात यावा, यासाठी गेली अनेक वर्षे सर्वच पक्षातील खासदार संसदेत मागणी करत होते. राज्यातून त्यासाठी जोरदार मागणी केली जात होती, त्यासाठी वेगळा आयोग स्थापन करून मराठी भाषा ही अभिजात दर्जासाठी कशी योग्य आहे, हे दाखवून देण्यात येत होते, पण मागणी काही मान्य होत नव्हती. खरे तर तो मराठी भाषेवर अन्याय होता. तो महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांची जी काही धूळधाण झाली, त्यानंतर धुवून काढण्यात आला. त्यामुळे जगभरातील मराठी माणूस भरून पावला. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर देशाच्या राजधानीत भरणारे हे पहिले मराठी साहित्य संमेलन असल्यामुळे त्याचा एक वेगळाच दिमाख होता. या आयोजनस्थळी एकेकाळी विजयी मराठ्यांची छावणी पडली होती. दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा, हे गीत एका काश्मिरी महिलेने यावेळी गायले. ते ऐकून सगळ्यांचे ऊर भरून आलेले असताना निलम गोंहे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना जे आरोप केले, त्यामुळे महाराष्ट्राची अखिल भारतीय बदनामी झाली. देशातील लोकांसमोर मराठी माणसांचे हसे झाले.

# मुस्लिमांच्या सामाजिक न्यायाचे संकल्पचित्र

**सरकारच मुस्लीमविरोधी असल्याचा आक्षेप सध्या खरा ठरत असला तरी, आपल्या देशाच्या सुमारे २० टक्के लोकसंख्येपैकी नेमकी कुणाला संधीची अधिक गरज आहे आणि ती कशी पूर्ण करता येईल, याचा विचार कधी ना कधी करावा लागणारच. हा विचार अलीकडेच एका अहवालाने केला, त्याचा हा ऊहापोह...**

मुस्लिमांसाठी आरक्षणही कल्पना वाईट आहे. मुस्लिमांसाठी सामाजिक न्यायाच्या धोरणाची आवश्यकता आहे. माज्याप्रमाणेच या दोन्ही विधानांशी तुम्ही सहमत असाल तर तुमचं म्हणणं विसंगत आहे, असं वाटू शकतं. त्यात तुमचा दोष नाही. ही अडचण सामाजिक न्यायाच्या भारतातल्या सध्याच्या राजकारणामुळे निर्माण झाली आहे. या राजकारणामुळे सार्वजनिक शिक्षणात आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण आणि सामाजिक न्याय हे जणू समानार्थी शब्द झाले आहेत. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या सर्व संघर्षांची परिणती कोट्याच्या राजकारणात किंवा कोट्याअंतर्गत कोटा यामध्ये होत राहाते. कोणत्याही समूहावर अन्याय झाला की ते आरक्षणाची मागणी करू लागतात मग तो माजी शासकीय अधिकाऱ्यांचा समूह असो, लैंगिकदृष्ट्या अल्पसंख्य समूह असो किंवा स्थलांतरित समूह असोत. जणू भारतीय राज्यसंस्था एखाद्या सर्जनसारखी आहे. कोणताही रुग्ण असो- या सर्जनच्या हातात चाकू हे एकच शस्त्र आहे!

त्यामुळे संपूर्ण मुस्लीम समुदायासाठी आरक्षण असले पाहिजे, अशी मागणी होत आहे, यात काहीही आश्चर्य नाही. सच्चर समितीने मुस्लीम समुदायाची 'सामाजिक धार्मिक समूह' म्हणून नोंद केल्यापासून या मागणीचा जोर वाढला. स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लिमांच्या भीषण शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थितीचा सर्वसमावेशक आढावा घेणारा हा पहिला अधिकृत अहवाल होता. या अहवालाने मुस्लिमांची विदारक परिस्थिती मांडली; पण त्यांना आरक्षण द्यावे, अशी शिफारस केली नाही. भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्याकांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाने अल्पसंख्याकांना शासकीय नोकऱ्या आणि शिक्षणात १५ टक्के (मुस्लिमांना १० टक्के) आरक्षण देण्यात यावे, अशी शिफारस केली. या शिफारसीला मुस्लीम नेत्यांनी पाठिंबा दिला. गेल्या काही वर्षांतील मुस्लिमांची परिस्थिती लक्षात घेऊन अनेक बुद्धिवंतांनीही या मागणीला समर्थन दिले. या राजवटीमध्ये हे आरक्षण दिले जाईल, असे कुणालाही वाटत नाही; पण मुस्लिमांना सामाजिक न्याय देण्यासाठी आरक्षणाची ही चौकट त्यांच्या पुढ्यात ठेवण्यात आलेली आहे.

अलीकडेच 'रिथिंकिंग ॲफर्मेटिव्ह ॲक्शन फॉर मुस्लिम्स इन कन्टेम्पररी इंडिया' या शीर्षकाचा अहवाल प्रसिद्ध झाला. हिलाल अहमद, मोहम्मद संजीर आलम आणि नझीरा परवीन यांनी 'यूएस-इंडिया पॉलिसी इन्स्टिट्यूट' आणि 'सेंटर फॉर पॉलिसी रीसर्च' या दोन संस्थांच्या वतीने केलेल्या संशोधनाच्या आधारे अहवालाचे लेखन केले आहे. हा अहवाल मुस्लिमांसाठीच्या सामाजिक न्यायाची चर्चा तीन टप्प्यांत पुढे नेतो.

मुस्लिमांना सामाजिक न्यायाची आवश्यकता का आहे, हा या अहवालातला पहिला मुद्दा आहे. सामाजिक न्यायासाठी संपूर्ण मुस्लीम समुदायाला आरक्षण देणे, हा काही चांगला उपाय असू शकत नाही, हा दुसरा मुद्दा. सर्वांत महत्त्वाचा तिसरा मुद्दा- सध्या विविध मुस्लीम समुदायांवर होत असलेल्या अन्यायाला तोंड देण्यासाठी विविध धोरणात्मक उपाय या अहवालाने सुचवले आहेत. या अत्यंत वादग्रस्त आणि संवेदनशील प्रश्नाबाबत सार्वजनिक धोरण काय असावे, यासाठीची नेमकी चौकट अहवालाने उपलब्ध करून दिली आहे. यानिमित्ताने मुस्लिमांसाठीच्या सामाजिक न्यायाची अधिक गंभीर चर्चा होणे गरजेचे.



पहिला मुद्दा अगदी प्राथमिक स्वरूपाचा आहे. मुस्लीम हा सध्याच्या राजवटीत दहशतीखाली वावरणारा धार्मिक अल्पसंख्य समूह आहेच. त्याशिवाय शैक्षणिक आणि आर्थिक बाबतीत वंचित असलेला हा समूह आहे. या अहवालाने सच्चर समितीमध्ये वर्णन केलेल्या मुस्लिमांच्या अवस्थेची कहाणी ताज्या आकडेवारीसह मांडली आहे. अलीकडच्या अधिकृत माहितीच्या आधारे, या अहवालात म्हटले आहे की, शैक्षणिक बाबतीत मुस्लिमांची अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) या समूहांशी तुलना होऊ शकते तर उत्पन्न आणि संपत्तीच्या बाबतीत त्यांची तुलना इतर मागासवर्गीयांसोबत (ओबीसी) होऊ शकते. आर्थिक स्थितीमुळे किंवा पालकांच्या शैक्षणिक स्तरामुळे तरुण मुस्लिमांच्या शिक्षणाची दुर्दशा झालेली नाही. समान आर्थिक अवस्था असलेल्या उच्चजातीय हिंदू आणि मुस्लिमांची तुलना केली तर, उच्च शिक्षण संस्थांमध्ये जाणाऱ्या, खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या, इंजिनीअरिंग आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या उच्चजातीय हिंदूंचे प्रमाण मुस्लिमांच्या प्रमाणाच्या दुपटीहून अधिक आहे. ही धक्कादायक अवस्था आहे. ही संधींची विषमता आहे! दक्षिण भारत आणि पश्चिम भारतातली अवस्था याहून बरीच बरी आहे. गेल्या काही वर्षांत सुधारणा होत असल्याची लक्षणे आहेत; मात्र एकुणात प्रचंड दरी लक्षात घेता मुस्लिमांच्या सामाजिक न्यायासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

या सामाजिक न्यायासाठी आरक्षण हा योग्य उपाय नाही, याला तीन कारणे आहेत. पहिला मुद्दा हा कायदेशीर आणि सांविधानिक स्वरूपाचा आहे. भारताचे संविधान एखाद्या धार्मिक समूहाला 'शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास समूह' अशी मान्यता देत नाही. न्यायव्यवस्थेने ती शक्यता नाकारलेली आहे. दुसरा मुद्दा समाजशास्त्रीय स्वरूपाचा आहे. मुस्लीम समूह एकसंध स्वरूपाचा नाही. हिंदूंमधील अनेक जातींमध्ये जशी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक भिन्नता आहे तशीच मुस्लीम समुदायातील बिरादरींमध्येही आहे. तिसरा मुद्दा राजकीय स्वरूपाचा आहे. सध्या किंवा नजीकच्या भविष्यात मुस्लिमांना आरक्षण दिल्याने देशभर त्याविरोधात असंतोष निर्माण केला जाईल. त्या विरोधात संघटनात्मक पातळीवर प्रयत्न केले जातील. ही बाब मुस्लिमांसाठी अजिबातच हितावह असणार नाही.

असे असेल तर मुस्लिमांबाबत होत असलेल्या सामाजिक आर्थिक भेदभावावर, अन्यायावर उत्तर काय? अस्मिता आणि सुरक्षा यांहून हा मुद्दा वेगळा आहे. धार्मिक पातळीवर ख्रिश्चनदेखील अस्मिता आणि सुरक्षेच्या मुद्द्यावर होरपळले; पण ते शैक्षणिक, आर्थिकदृष्ट्या मागास किंवा वंचित नाहीत. त्यामुळेच या अहवालाने विविध धोरणात्मक उपाय सुचवले आहेत. ते फक्त मुस्लिमांसाठीच आहेत, असे नव्हे; पण एकुणात मुस्लिमांच्या शैक्षणिक आणि आर्थिक अवस्थेमध्ये प्रगती होण्यासाठी ही धोरणे महत्त्वाची आहेत.

या अहवालाने धार्मिक आधारावर 'कोटाकेंद्री' आरक्षणाला पर्याय सुचवले आहेत. पहिला पर्याय आहे तो मुस्लीम समुदायातील सर्व मागास जातींचा ओबीसी प्रवर्गात समावेश करणे. सर्व मुस्लीम समुदायाला आरक्षण देणे किंवा संपूर्ण मुस्लीम समुदायाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याऐवजी हा पर्याय या अहवालात मांडला आहे. सध्या एकूण मुस्लीम समुदायाच्या साधारण निम्म्या लोकसंख्येचा समावेश ओबीसी प्रवर्गात होतो. वेगवेगळ्या अहवालांनुसार ७५ टक्के मुस्लीम समुदाय ओबीसी प्रवर्गास मिळत असलेले लाभ घेण्यास पात्र आहे. आंध्र प्रदेश, तेलंगण आणि पश्चिम बंगाल यांसारख्या राज्यांनी मुस्लिमांमधील अधिकाधिक जातींचा ओबीसी प्रवर्गात समावेश केला आहे. आता उत्तर भारततही हाच मार्ग अवलंबण्याची आवश्यकता आहे.

सरधोपटपणे सर्व मुस्लिमांना ओबीसी प्रवर्गात सामाविष्ट करून घेण्याऐवजी 'आत्यंतिक मागास' आणि 'ह्यमागास जाती' अशा दोन संवर्गात या जातींचा समावेश असावा, अशी सूचना या अहवालात आहे. केरळ आणि कर्नाटकमध्ये मुस्लीम ओबीसी असा उपवर्ग आहे त्याप्रमाणे स्वतंत्र उपवर्ग करू नये, असेही हा अहवाल सुचवतो. मुस्लीम जातींच्या वंचिततेच्या स्तरानुसार त्यांचा ओबीसीमधील वेगवेगळ्या याद्यांमध्ये समावेश व्हावा. सध्या 'अस्पृश्य' मुस्लीम जातींना 'अनुसूचित जाती'(एससी) समूहांचे लाभ दिले जात नाहीत. त्यामुळे 'दलित मुस्लिमां'ना आरक्षणाचे लाभ मिळाले पाहिजेत. धार्मिक आधारावर संस्थात्मक भेदभाव लक्षात घेता त्याविरोधात कायदा व्हावा. त्याची अंमलबजावणी होण्यासाठी समान संधी आयोग नेमण्यात यावा, असे या अहवालाने सुचवले आहे.

या अहवालाच्या शिफारसी केवळ सार्वजनिक क्षेत्रापुरत्या आणि फक्त आरक्षणापुरत्या मर्यादित नाहीत. अहवालाने विविध भागांतील परिस्थितीचा विचार करून उपाययोजना सुचवल्या आहेत. मुस्लीमबहुल भागात सार्वजनिक पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता या अहवालाने प्रतिपादित केली आहे. सच्चर समितीनंतर हा असा पहिलाच प्रयत्न आहे. अल्पसंख्याकांची लोकसंख्या अधिक असलेले प्रभाग (वॉर्ड), गाव, तालुके आणि जिल्हे ठरवून त्यानुसार त्यांना मदत करता येऊ शकते. हे करताना या सुविधा बिगर मुस्लिमांनीच बळकावता कामा नयेत, याची खबरदारी घेतली पाहिजे. राज्यसंस्थेने विविध उद्योगक्षेत्रांनुसार प्राधान्यक्रम ठरवला पाहिजे. उदाहरणार्थ, मुस्लीम समुदायाचा मोठा सहभाग असलेले उद्योगझ्रविणकाम, ब्रास उत्पादन, कार्पेट उद्योग, अत्तर उद्योग आणि मांस उद्योग यांसारख्या उद्योगांना राज्यसंस्थेकडून पाठबळ देण्यात यावे. जिथे मुस्लीम विद्यार्थी अधिक आहेत, अशा शैक्षणिक संस्थांमध्येही त्यांच्या प्रगतीसाठी विशेष प्रयत्न केले जावेत.

या अहवालातील शिफारसी अगदीच प्राथमिक अवस्थेत असल्या तरीही त्यांनी खासगी क्षेत्राशी सहकार्याकडेही निर्देश केला आहे. खासगी क्षेत्रात 'कोटा पद्धत' राबवल्यास त्याचा उलटाच परिणाम होईल; पण शासनाचे अनुदान आणि कंत्राटे मिळवताना विविधता असण्याबाबत शासनाने खासगी क्षेत्राला निर्देश दिले पाहिजेत आणि सर्वांत शेवटचा मुद्दा म्हणजे बिगर शासकीय संस्था, स्वयंसहाय्य तत्त्वावर चालणाऱ्या संघटना आणि समाजसेवी संस्था या सर्वांना सर्जनशील पद्धतीने सहभागी करून घेऊन स्थानिक मुस्लीम समुदायाला मदत होण्यासाठीचे प्रयत्न केले पाहिजेत.

हे सारे महत्त्वाचे असले तरी यातले काहीच आता होणार नाही, कारण हे सरकारच मुळात मुस्लीम विरोधाच्या अधिष्ठानावर उभे आहे. भविष्यात जेव्हा वेळ येईल तेव्हा मुस्लिमांच्या सामाजिक न्यायासाठी एक संकल्पचित्र रेखाटण्याची आवश्यकता आहे. या अहवालाने हे संकल्पचित्र रेखाटून, मुस्लिमांच्या सामाजिक न्यायासाठीचे व्यवहार्य मार्ग सुचवले आहेत. त्याचा उपयोग नजीकच्या भविष्यात होईल.

# महानगरी प्रदूषणाचा विळखा

**पर्यावरणाबाबत थोडी सजगता दाखवली तर आपण आपल्या घटनेने दिलेला प्रदूषणविरहित पर्यावरणात जगण्याचा अधिकार अबाधित ठेवू शकतो आणि आपल्यानंतरच्या पिढ्यांसाठी हा ग्रह अधिक जगण्यालायक स्थितीत सोडू शकतो.**



भारतीय संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकास 'परिच्छेद २१' नुसार जगण्याचा मूलभूत अधिकार दिलेला आहे. या जगण्याच्या अधिकारात बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टींचा अंतर्भाव आहे; म्हणजे प्रत्येक नागरिकास आपले आयुष्य चांगल्या प्रकारे व प्रतिष्ठेने जगता आले पाहिजे. चांगले आयुष्य जगण्यासाठी प्रत्येकाला स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, प्रदूषणविरहित पर्यावरण पाहिजे. हा अधिकार घटनेने दिला आहे. म्हणजे या देशातील सरकारने व प्रत्येक नागरिकाने किंबहुना प्रत्येक पिढीने आपल्या पुढील किमान एक-दोन पिढ्यांसाठीतरी पर्यावरण प्रदूषणविरहित ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे, पण आता इथून पुढे महानगरांतील परिस्थिती पाहता हे फारच कठीण दिसत आहे. कोळशाच्या भट्ट्या बंद करण्यासाठी कारवाई करण्याची वेळ मुंबईवर येत आहे, भविष्यात परिस्थिती अधिक अवघड होत जाणार आहे. आधीच विचित्र हवामान बदलांमुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत, त्यात प्रदूषणाने मोठी भर पडत आहे.

आपल्या पूर्वीच्या पिढ्यांनी आपल्यासाठी फार चांगले पर्यावरण राखून ठेवले होते म्हणून आपण आतापर्यंत अगदी २१ व्या शतकातील २५ वर्षांपर्यंत तुलनेने चांगले आयुष्य जगत आहोत. सत्तरच्या दशकात जन्मलेले, म्हणजे ज्यांनी आता पन्नाशी पूर्ण केली आहे, त्यांचे यामध्ये खूप मोठे योगदान आहे. कारण त्यांचे आणि त्यांच्या आधीच्या लोकांचे राहणीमान खूप साधे आणि सोपे होते. त्यांच्या गरजा खूप कमी होत्या. कारण ते जे जे नैसर्गिक आणि ज्या वस्तूंचे लवकर विघटन होते, त्याच वस्तू वापरत होते. म्हणजे तोपर्यंत आपल्या जीवनात प्लास्टिक, थमाकोल आणि प्लास्टर ऑफ पॅरिस या भयंकर असुरांचा शिरकाव झाला नव्हता. त्यामुळे ही पिढी पन्नास-साठ वर्षांपर्यंत तरी काही अपवाद सोडले तर निरोगी आयुष्य जगत आहे.

जसजशी 'वापरा आणि फेका' संस्कृती आली तशी निसगार्ची हानी सुरू झाली. प्लास्टिक, थमाकोल व प्लास्टर ऑफ पॅरिस यांच्या वापरावर बरीच बंधने आली. मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली अजूनही त्यातून १०० टक्के सुटका झालेली नाही. यांच्या अतिवापरामुळे जमीन आणि पाण्याचे प्रदूषण होतेच आहे आणि ज्याच्याशिवाय आपण जगूच शकत नाही तो शुद्ध ऑक्सिजन म्हणजे प्राणवायू मिळणे इथून पुढे अतिशय कठीण होणार आहे. कारण अलीकडेच दिल्ली, बेंगळुरू, पुणे, ठाणे, मुंबईमधील हवेची स्थिती पाहता प्रदूषणाचे भयंकर संकट डोके वर काढत आहे आणि अखिल मानव जातीला ते विळखा घालत आहे.

शहरांमधून अगदी दुपारपर्यंत हवेमध्ये दाट धुरके दिसत आहे. दिल्लीच्या हवेतील प्रदूषणाची कल्पना सर्वांना आहेच, पण आता मुंबई, पुणे, ठाण्यामधील हवेची गुणवत्तासुद्धा बरीच खालावलेली आहे. यामुळे ज्यांची प्रतिकारशक्ती कमी आहे, असे नागरिक, शिवाय लहान मुले व वृद्ध यांना त्रास होतो आहे. ज्यांना अस्थमा किंवा श्वसनाचा त्रास होतो, त्यांची अवस्था तर बिकट होते. मुंबई, ठाण्यामध्ये मेट्रो, रस्ते रुंदीकरण, जुन्या इमारतींचा पुनर्विकास आणि नवीन इमारतींची बांधकामे मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. त्यामुळे धुळीचे कण प्रचंड प्रमाणावर दिवसभर हवेत तरंगत असतात.

आता मेट्रो, रस्ते रुंदीकरण आणि पुनर्विकास ही विकासाची कामे म्हणता येतील. विकास करायचा म्हटले तर थोडा त्रास सहन करावा लागतोच, ही अपेक्षा योग्य असली तरी विकास हा 'शाश्वत' असला पाहिजे, याकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष होते. केवळ सिमेंट कॉंक्रीटचे जंगल म्हणजे विकास नव्हे. जेवढी झाडे तोडली जातात, तेवढी लावली जात नाहीत आणि लावली तरी ती जगवली जात नाहीत. मेट्रोची आणि पुनर्विकासाची कामे दहाझ्र दहा वर्षे चालू असतात आणि आहेत. त्यामुळे हवेचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे.

शिवाय यात भर म्हणून विवाह व लोकप्रतिनिधींचे कार्यक्रम कुठे ना कुठे सतत चालूच असतात. त्यामध्ये अनुक्रमे वराती आणि लोकप्रतिनिधींचे स्वागत यावेळी प्रचंड प्रमाणात फटाके फोडले जातात. त्यामुळे ध्वनी व हवेचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. फटाक्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूर बाहेर पडतो. त्या धुरामध्ये रसायने असल्यामुळे सर्दी, खोकला, दमा, क्षय अशा आजारांचे प्रमाण खूपच वाढले आहे. ठाण्यामध्ये तर रात्री बारानंतर नेहमीच फटाके वाजवले जात आहेत. त्यामुळे सर्वांची झोपमोड तर होतेच, शिवाय म्हाताऱ्या व लहान मुलांना तसेच जे रक्तदाब, मधुमेहाचे रुग्ण आहेत, त्यांना खूप त्रास होतो.

हवेचे प्रदूषण खूप मोठ्या प्रमाणात वाढले असल्याचे शहरांमध्ये रोजच अनुभवता येते. धुक्यासोबत आता दीर्घकाळ धुरकेही ठाण मांडून असते. धुके आणि धुरके यामध्ये खूप फरक आहे. धुके असते, ते सूर्यकिरण आले की नाहीसे होते; पण धुरके हे धूर व धुके यांचे मिश्रण असते. धुरके म्हणजे धूळ, धूर, राख, सल्फर, नायट्रोजन, कार्बनडायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड अशा घातक वायूंचे मिश्रण. ते उन्हामध्येही कायम राहते. यामुळे श्वसनाला त्रास होतोच; शिवाय दिवसभर दृष्यमानताही खूप कमी होते, परिणामी विमान उड्डाणांनाही त्याचा फटका बसतो.

अलीकडे महानगरांमध्ये वाहनांची संख्या इतकी प्रचंड वाढली आहे, की रोजच प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे प्रदूषण वाढत आहे. गेल्या २५ वर्षांत पुण्यामध्ये रस्त्यांच्या संख्येत ४० टक्क्यांनी, तर वाहनांच्या संख्येत तब्बल ४०० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मुंबईमध्ये गेल्या १० वर्षांत वाहनांची संख्या १०० टक्क्यांनी वाढली आहे, म्हणजे प्रतिकिमी वाहनांची संख्या आहे तब्बल २३००! यावरून आपल्या पुढील पिढ्यांना हे हवेचे धोकादायक, विषारी प्रदूषण किती भयंकर प्रमाणात विळखा घालत आहे, हे ध्यानात घेऊन सर्व नागरिकांनी जबाबदारीने वागले पाहिजे.

प्रत्येकाने शक्य असेल तिथे सार्वजनिक वाहनांनी प्रवास करावा. ते इथून पुढे गरजेचे झाले आहे. हा विषारी धूर वाहने, कारखाने, फटाके, बेकऱ्या, ठिकठिकाणी लागणाऱ्या आगी, कचरा जाळणे, अरण्यातील वणवे यातून हवेत मिसळत असतो. आजकाल प्रत्येक छोटामोठा आनंद साजरा करण्यासाठी फटाके वाजवले जातात आणि त्यामुळे आगीसुद्धा लागतात. फटाके वाजवल्यामुळे तिहेरी नुकसान होते, एक तर ध्वनी प्रदूषण, दुसरे हवा प्रदूषण आणि तिसरे अपघात किंवा आगी लागणे. फटाक्यांतून मिळणाऱ्या आनंदासाठी मोजावी लागणारी ही किंमत खूपच जास्त आहे. आपण हे टाळले तर महानगरांतील प्रदूषण आपण बऱ्याच अंशी कमी करू शकतो.

सध्याची ठाणे, पुणे, मुंबई आणि अन्य शहरांची स्थिती पाहता आपल्यावरही दिल्लीसारखी हवा प्रदूषण वाढले की शाळा बंद, विमानउड्डाणे बंद, वाहने पार्क करण्यासाठी सम-विषम तारीख ठरवणे ही वेळ भविष्यात यायला वेळ लागणार नाही. म्हणून लोकांनी, लोकप्रतिनिधींनी अधिक सजग होण्याची गरज आहे. 'मला काय त्याचे' हा दृष्टिकोन केवळ आपल्यासाठीच नव्हे तर आपल्या पुढील पिढ्यांसाठी खूपच घातक ठरू शकतो. पर्यावरणाबाबत थोडी सजगता दाखवली तर आपण आपल्या घटनेने दिलेला प्रदूषणविरहित पर्यावरणात जगण्याचा अधिकार अबाधित ठेवू शकतो आणि आपल्यानंतरच्या पिढ्यांसाठी हा ग्रह अधिक जगण्यालायक स्थितीत सोडू शकतो.

# धोरण धरसोडीतले नापास शिक्षण!

शाळा आहे... पण शिक्षक नाही! धोरण आहे; पण समन्वय नाही! या सगळ्यात शिक्षण आहे का? माहीत नाही! देशाची शैक्षणिक राजधानी ज्या राज्यात आहे, त्या महाराष्ट्राचे हे चित्र आहे. गेल्या तीन दिवसांत शालेय शिक्षणाच्या संदर्भात आलेल्या बातम्यांवर नजर टाकली, तरी 'श्रीमंत' महाराष्ट्राची ही शैक्षणिक कंगाली लक्षात येईल. पहिली बातमी म्हणजे, 'आडमार्गाने शाळा बंद करण्याचा घाट' घातल्याची. हे समजले, ते राज्यात सुरू असलेल्या शाळांच्या संचमान्यतेच्या प्रक्रियेमुळे. विद्यार्थीसंख्येनुसार शाळेत किती शिक्षक असावेत, याची संख्या काढून तेवढ्या शिक्षक पदांना मंजुरी देणे अशी ही प्रक्रिया. या संचमान्यतेसाठी शाळांना तपशील भरण्यास सांगण्यात आले आहे. ते करताना असे लक्षात आले, की इयत्ता सहावी ते आठवीच्या ज्या शाळांत वीसपेक्षा कमी विद्यार्थीसंख्या आहे, त्या शाळांना शिक्षक पदेच मंजूर नाहीत. आता राज्यात वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा नाहीत, असे नाही आणि ज्या आहेत, त्या बंद केल्या जाणार नाहीत, असे सरकारच म्हणते. पण शिक्षकच दिले जाणार नसतील, तर या शाळा चालणार कशा, याचे उत्तर मात्र सरकार देत नाही. कमी पटसंख्येच्या शाळांत पूर्वी कंत्राटी शिक्षक नेमण्याची तरतूद होती. पण तो निर्णयही सरकारने रद्द केला आहे. हे म्हणजे, रस्ता केला आहे, पण त्या मार्गावरून कोणतेच वाहन न्यायचे नाही, असे झाले.

एकीकडे हा प्रकार, तर दुसरीकडे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या 'युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन' अर्थात 'यू-डायस' या मंचावरची आकडेवारी आणखीच वेगळे काही सांगणारी. यू-डायस म्हणते आहे की, महाराष्ट्रासारख्या राज्यात विद्यार्थीसंख्येच्या तुलनेत शाळा कमी आहेत! याचा दुसरा अर्थ असा, की शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणखी शाळा सुरू करा. इथे अस्तित्वात असलेल्या शाळांनाच शिक्षक देण्याची बोंब, तेथे नवीन कधी सुरू करणार? राज्य सरकारचा तर काही काळापूर्वी असा विचार होता, की वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या जवळपासच्या काही शाळांचे एकत्रीकरण करून, त्या भागात एकच समूह शाळा सुरू करायची. याला विरोध झाला, कारण आत्ता किमान घराजवळ शाळा आहे, म्हणून मोजके का होईना विद्यार्थी शाळेत येत होते, तेही बंद होतील. ते शाळेत येणे बंद होणे हे सरळ सरळ शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन. ते लक्षात आल्याने म्हणा किंवा उपरती झाली म्हणून म्हणा, सरकारने कमी पटसंख्येच्या शाळा बंद करणार नाही, असे जाहीर केले. पण वरवर निर्णय काहीही असो, आतून इच्छा काय आहे, यावरच त्याचे यश अवलंबून असते. कमी पटसंख्येच्या शाळांना शिक्षक पदे मंजूर न करणे, हे शाळा बंद करण्याची इच्छा दुसऱ्या मार्गाने व्यक्त करणे आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये आणि तेही डबल इंजिनमधल्या मोठ्या इंजिनाची अधिकृत संस्था (यू-डायस) विद्यार्थीसंख्येएवढ्या शाळा तुमच्याकडे नाहीत, असे सांगत असूनसुद्धा.

दुसरी बातमी, राज्यातील शाळांचे शैक्षणिक वर्ष यंदापासूनच एक एप्रिलपासून सुरू करण्याचा प्रयत्न असल्याची माहिती शिक्षण राज्यमंत्र्यांनी दिल्याची. राज्याचा अभ्यासक्रम 'सीबीएसई'च्या धर्तीवर करण्याचा जो 'विडा' महाराष्ट्राने उचलला आहे, त्यालाच अनुषंगून असलेले हे पाऊल. राज्याची स्वतंत्र ओळख सगळीकडून संपवून 'एक देश, एक अमुक', 'एक देश, एक तमुक'च्या चालीवर चालण्याच्या आणि केंद्र जे म्हणेल, तसे करण्याच्या प्रयत्नांत ही अशी 'तत्परता' दाखविण्याचे सुचल्याने मंत्री तसे बोलले असावेत! मात्र यामुळे शिक्षण संस्था, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी सगळेच अचंब्यात पडले. एक एप्रिलपासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू करायचे, तर आधीचे संपवून, निकाल लावून विद्यार्थी वरच्या वर्गात वगैरे जाणे आदी प्रक्रियांना आत्ता हातात वेळ आहे का, असे स्वाभाविक प्रश्न या घटकांना पडले. ही धांदल उडाल्यानंतर शिक्षण आयुक्तांना यंदा जूनपासूनच शाळा सुरू होणार असल्याचे स्पष्टीकरण द्यावे लागले. नवल वाटते ते याचे की, जे प्रश्न सामान्य माणसाच्या मनातही स्वाभाविकपणे उमटू शकतील, त्याची त्या खात्याच्या मंत्र्यांना साधी पुसटशी कल्पनाही येऊ नये! शिक्षणाच्या बाबतीतील धोरण धरसोड आता या राज्याला नवीन नाही. त्यातून सगळ्याच 'मागण्या' पूर्ण करण्याची आश्वासने द्यायची सरकारला भारी हौस. त्यासाठी सरकारला शाळाही हव्यात, शिक्षकांची पदे मंजूर नाहीत तरी शिक्षक हवेत, विद्यार्थीही हवेत, पालकही हवेत. पण या सगळ्या घटकांचा विचार करून शिक्षण देणारे सर्वंकष धोरण व त्याची नीट अंमलबजावणी करणारेही हवे आहेत, हे विसरून कसे चालेल? त्याअभावी शिक्षण वरच्या वर्गात जात नाहीये, त्याचे काय?

## टोमॅटोची व चिंचेची चटणी

**साहित्य :** अर्धा किलो टोमॅटो, ५-७ लसणाच्या पाकळ्या, अर्धी वाटी तेल, चमचाभर मोहरी, आवडीनुसार तिखट व मीठ, थोडासा चिंचेचा गाळलेला कोळ, अर्धा चमचा मेथी दाणे, थोडासा कढीपत्ता व हिंग, दोन चमचे साखर.

**कृती :** सर्वप्रथम कढईत तेल घालून हिंग व मेथी परतून घ्या. त्याची पावडर करा. लसूण आणि टोमॅटोही मिक्सरमध्ये घालून त्याची पेस्ट करून घ्या. ती पेस्ट घट्ट होईपर्यंत शिजवा. आता एका कढईत जास्त तेल घालनू त्यावर मोहरी व कढीपत्त्याची फोडणी तयार करा. त्यात चिंचेचा कोळ, हिंग, मेथीची पावडर, मीठ, तिखट घाला. कोळ शिजू लागला की टोमॅटोची पेस्ट व साखर घालून पाच मिनिटे शिजवा.



## डान्स करताय? हे फायदे समजून घ्याच

**नृत्य हे मन, शरीर आणि आत्मा यांच्यासाठी समग्र क्रियाकल्प आहे. नृत्य एक शारीरिक क्रियाकल्प आणि सर्जनशील भावनेच्या माध्यमातून वापरल्याने, ऊर्जा कुशलतेने हाताळण्यास मदत करते आणि यामध्ये नृत्य आर्ट कौशल्य, ज्ञान आणि समज विकसित होण्यास मदत शिकण्यासोबतच लोक काही तरी शोधत असतात आणि त्यांना ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी होतात. ज्या लोकांना अंतर्दृष्टी समजून त्यांना स्वतःला व्यक्त करण्यासाठी एक प्लॅटफॉर्म मिळते आणि त्यांचे सकारात्मकरीत्या परिवर्तित होते. निर्माण होणारी आणि परफॉर्मिंग होते. नृत्य आवडणाऱ्या घ्यायची असते व्यक्तिमत्त्व**



**सध्याच्या** काळामध्ये आपला बहुमूल्य वेळ तंत्रज्ञान आणि सोशल मीडिया घेते, तेव्हा नृत्य हा एक असा छंद आहे जेथे एखादी व्यक्ती शिकू शकते, आनंद घेऊ शकते आणि त्याच वेळी कामही करू शकते. प्रत्येक वर्गामध्ये फिटनेस लेवल, आत्मविश्वास, लक्ष केंद्रित करणे, एकाग्रता, सांघिक भावना, सकारात्मक विचार, शिस्त, शरीराची ठेवण असे सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जाते. डान्स नेहमी स्वच्छ वातावरणात शिकला जातो त्यामुळे मनही प्रसन्न राहते. प्रत्येक विद्यार्थ्याला किंवा ग्रुपकडे समान लक्ष दिल्याने समानतेची भावना मिळते. नृत्य शिकत असताना फक्त शारीरिक क्रियाकल्प करत नाहीत तर यामधून आत्मविश्वास वाढतो, रक्त अभिसरण प्रक्रिया सुधारते, मांसपेशी मजबूत होतात आणि वजन वाढते; चांगले समन्वय आणि कौशल्य विकसित होते. नृत्य हे शरीरातील ऊर्जा आणि भावना बाहेर सोडण्याचा एक चांगला मार्ग आहे. जेव्हा आपण नृत्य करतो तेव्हा घाम येतो आणि घामाद्वारे चांगले वाटणारे एण्डॉर्फिन बाहेर उत्सर्जित होते, ज्यामुळे आपल्याला आनंदी वाटते. चांगले संगीतही मनाला शांती देते. नृत्य हे संगीताला जिवंत रूप देण्याचे काम करते. शिकण्याची पद्धत ही परस्पर संवादात्मक असल्याने शिक्षण प्रक्रिया तणावमुक्त आणि अधिक मजेदार असते.

माझ्यासाठी आरोग्य ही एक मनाची स्थिती आहे आणि फिटनेस हा जगण्याचा मार्ग. तंदुरुस्त शरीरामध्ये निरोगी मन असते. नृत्य संपूर्ण फिटनेस, सहनशक्ती आणि स्नायूंची बळकटी तसेच संपूर्ण शरीरामध्ये ताकद वाढवण्यास मदत करते. यात कार्डियो व्हॅस्क्युलर / एरोबिक फिटनेस, कोर आणि शरीरातील लवचिकतेसाठी स्ट्रेचिंगचा समावेश केला जातो. ग्रुपमध्ये एकत्रितपणे काम केल्याने संघाचे महत्त्व तसेच सांघिक भावना वाढते. नृत्यासाठी भरपूर सहनशक्ती आवश्यक असते जी शरीर चपळ बनवण्यास मदत करते. अशा प्रकारे नृत्य मधून मनःशांती, एकाग्रता, चपळता, तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यास मदत असे अनेक प्रकाचे फायदे होतात.

## रिकाम्या पोटी प्या गुळ-जिऱ्याचे पाणी आरोग्यास ठरेल लाभदायक

**प्रत्येकाच्या घरी स्वयंपाकघरामध्ये जिरे सहज उपलब्ध होते. जिऱ्याचा वापर अनेक भाज्या बनवताना केला जातो. जिऱ्यामुळे अन्न पचायला मदत होते. तसेच गुळदेखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हिवाळ्यात गुळाचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात.**

गुळ आरोग्यासाठी एक वरदान मानला जातो. आयुर्वेदातही गुळाचे महत्त्व सांगितलेले आहे. आपल्याला माहीत आहे की, गुळ आणि जिरे आपल्या आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे? चला जाणून घेऊयात याचे शरीराला होणारे फायदे...

**ॲनिमिया रुग्णांसाठी फायदेशीर :** गुळ आणि जिऱ्याचे पाणी पिण्याने ॲनिमिया किंवा रक्ताची कमी भरून निघण्यास फायदेशीर ठरते. तसेच रक्तामधील अशुद्धता दूर होते.

**डोकेदुखीपासून आराम :** थंडीमध्ये बऱ्याच लोकांना डोकेदुखीचा त्रास जाणवतो. अशावेळी गुळ-जिऱ्याचे पाणी पिण्याने फायदा होतो.

**कंबरदुखीवर फायदेशीर :** हिवाळ्यात अनेकांना कंबरदुखीचा त्रास होतो. जर गुळ आणि जिऱ्याचे पाणी घेतल्याने कंबरदुखीपासून आराम मिळतो.

**रोगप्रतिकार क्षमता वाढवते :** गुळ आणि जिरे आपल्या शरीरात घाण साफ करण्यासोबतच शरीराची रोग प्रतिकारक क्षमता वाढवण्यास मदत करते.

**मासिक पाळीच्या त्रासापासून आराम :** गुळ आणि जिऱ्याचे पाणी घेतल्याने अनियमित मासिक पाळी आणि पोटदुखीच्या समस्या दूर होतात.



**गुळ आणि जिऱ्याचे पाणी कसे बनवावे**

एका वाडग्यात दोन कप पाणी घ्या. यामध्ये एक चमचा गुळाचा चुरा आणि एक चमचा जिरे टाकून चांगली उकळी घ्या. यानंतर हे पाणी कप घेऊन पिऊ शकता. मात्र लक्षात ठेवा, हे पाणी सकाळी रिकाम्या पोटी घेणे आवश्यक आहे.

## एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ (पर्यावरण कायदा) मध्ये करिअर बनवा, पात्रता, अभ्यासक्रम, शीर्ष महाविद्यालय, व्याप्ती जाणून घ्या

**एलएलएम इन एन्व्हायरमेंटल लॉ हा पूर्णवेळ पीजी प्रोग्राम आहे ज्यामध्ये २ वर्षांचा कालावधी आहे ज्यामध्ये पर्यावरण संरक्षण, हवामान बदल संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर यासाठी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर फ्रेमवर्क समाविष्ट आहे. या अभ्यासक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरण कायद्याशी संबंधित विषय जसे की जल कायदा, व्यवसाय आणि व्यापार, विविध प्रकारचे प्रदूषण, जमिनीचे प्रश्न, पर्यावरणीय न्याय इत्यादी विषय शिकवले जातात.**




**पात्रता :** उमेदवारांनी मान्यताप्राप्त महाविद्यालय किंवा विद्यापीठातून पदवी + एलएलबी किंवा बीएएलबीमध्ये बॅचलर पदवी असणे आवश्यक आहे. एलएलबी पदवीमध्ये उमेदवाराला एकूण किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे. उमेदवारांनी त्यांच्या पसंतीच्या महाविद्यालयांमध्ये जागा मिळवण्यासाठी CLAT-PG/AILET/DU LLM/ MHCET कायदा/LSATसारख्या कोणत्याही एक सामान्य प्रवेश परीक्षेतही पात्र असणे आवश्यक आहे. एसटी/एससी आणि ओबीसीमधील उमेदवारांना अनिवार्य प्रक्रिया म्हणून कोर्स प्रोग्राममध्ये ५ टक्के सूट दिली जाते.

**प्रवेश प्रक्रिया :** कोणत्याही सर्वोच्च विद्यापीठात एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ कोर्समध्ये प्रवेश घेण्यासाठी उमेदवारांना प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, एक वैयक्तिक मुलाखत आहे आणि जर उमेदवारांनी त्यात चांगले गुण मिळवले तर त्यांना शिष्यवृत्ती देखील मिळू शकते.

**नोंदणी :** उमेदवार अधिकृत वेबसाइटवर जातात. अधिकृत वेबसाइटला भेट दिल्यानंतर अर्ज भरा. अर्ज भरल्यानंतर तो नीट तपासून घ्या, जर फॉर्ममध्ये चूक असेल तर तो नाकारला जाऊ शकतो. विनंती केलेली कागदपत्रे अपलोड करा. अर्ज सादर करा. क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्डद्वारे ऑनलाइन फॉर्म फी भरा.

**टप्पा २ : प्रवेश परीक्षा :** जर उमेदवारांनी एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ मध्ये प्रवेश घेण्यासाठी उच्च विद्यापीठांचे लक्ष्य ठेवले असेल, तर त्यांच्यासाठी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करणे खूप महत्त्वाचे आहे. ज्यासाठी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशपत्र जारी केले जातात. ज्यामध्ये प्रवेश परीक्षेशी संबंधित सर्व माहिती दिली जाते जसे की परीक्षा कधी आणि कुठे होणार आहे, इत्यादी. एलएलएम बिझनेस लॉची प्रवेश प्रक्रिया CLAT-PG/AILET/ DU LLM/MHCET Law/LSAT इत्यादी प्रवेश परीक्षेवर अवलंबून असते. पात्र उमेदवारांची पुढील मुलाखतीच्या आधारे निवड केली जाते. प्रवेश परीक्षा झाल्यानंतर काही दिवसांनी, त्याचा निकाल जाहीर केला जातो, त्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या वेबसाइट्स आणि सोशल मीडिया हँडलची नियमितपणे तपासणी करून स्वतःला अपडेट ठेवले पाहिजे. जे विद्यार्थी प्रवेश परीक्षेत पात्र ठरतील त्यांना विद्यापीठातर्फे मुलाखतीसाठी हजर राहण्यास सांगितले जाईल - एकतर ऑनलाइन (स्काईप, गुगल मीट, झूम) किंवा ऑफलाइन विद्यार्थ्यांना विद्यापीठ कॅम्पसमध्ये बोलावून. दरम्यान, इतर सर्व पात्रता निकषांची तपासणी केली जाते आणि जर विद्यार्थ्यांनी मुलाखतीत चांगली कामगिरी केली तर त्यांना एन्व्हायरमेंटल कायद्यातील एलएलएमचा अभ्यास करण्यासाठी प्रवेश दिला जातो.

**अभ्यासक्रम**

- मॉड्यूल I निसर्ग आणि पर्यावरण कायद्याची व्याप्ती
- मॉड्यूल II आंतरराष्ट्रीय कायदा आणि पर्यावरण संरक्षण
- मॉड्यूल III भारतातील पर्यावरण कायद्याचा इतिहास व विकास
- मॉड्यूल IV भारतीय संविधान अंतर्गत पर्यावरण संरक्षण
- मॉड्यूल V पर्यावरण संरक्षण, सामान्य नागरी, फौजदारी कायदा
- मॉड्यूल VI भारतातील पाणी, हवा आणि पर्यावरणाचे संरक्षण
- मॉड्यूल VII वन, वन्यजीव आणि जैवविविधतेचे संरक्षण
- मॉड्यूल VIII पर्यावरण कायद्यातील उदयोन्मुख समस्या

**शीर्ष महाविद्यालये**

- तामिळनाडू डॉ. आंबेडकर लॉ युनिव्हर्सिटी, तामिळनाडू
- हिदायतुल्ला राष्ट्रीय कायदा विद्यापीठ, रायपूर
- राष्ट्रीय कायदा विद्यापीठ आणि न्यायिक अकादमी, आसाम
- टेरी युनिव्हर्सिटी, नवी दिल्ली

## वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



## चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

**सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?**






**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर :** लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होतो. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

**त्वचेसाठी वरदान आहे कांदा :** कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर :** तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

## घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



**साहित्य :** एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

**कृती :** बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

## 'ब्लॅक टी'चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते.

टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.

चहात अँण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.



ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.

## अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा; असे ठेवा नियंत्रण

**दररोज पुढे जाण्याच्या शर्यतीत प्रत्येक व्यक्ती धकाधकीचं आयुष्य जगत आहे. लवकर पुढे जात लवकर यश मिळवण्याच्या नादात अनेक जण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. सोपं, लवकर आणि जिभेच्या चवी पुरवण्यासाठी अनेक जण फास्ट फूडच्या आहारी गेले आहेत. या फास्ट फूडमुळेच अनेक जण लठ्ठपणाचे शिकार होत आहेत. अशाप्रकारे आलेला लठ्ठपणा कमी करणं तितकंसं सोपं नाही. लठ्ठपणामुळेच शरीरात अनेक प्रकारचे विकार बळावतात. अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा असून शरीरातील लठ्ठपणामुळेच अनेक आजारांना निमंत्रण दिले जाते.**



लठ्ठपणाचे निदान व्यक्तीच्या शारीरिक तपासणी आणि त्याच्या इतिहासावर अवलंबून आहे. लठ्ठपणामुळे आलेल्या रोगांची शक्यता तपासण्यासाठी व्यक्तीच्या 'बीएमआय' बॉडी मास इंडेक्सचे मापन केले जाते. आई-वडिलांपैकी एकाला लठ्ठपणा असल्यास मुलांमध्येही लठ्ठपणा होण्याची शक्यता असते. कॅलरीयुक्त आहार, जंक, फास्ट फूड, पेय पदार्थांचे अधिक सेवन यामुळे लठ्ठपणाची समस्या निर्माण होण्यास सुरुवात होते. फळं, भाज्या यांच्या कमी सेवनानेही व्यक्ती लठ्ठपणाचा शिकार होऊ शकतात. लठ्ठपणामुळे स्ट्रोक, कॅन्सर, प्रजनन क्षमता कमी होणे, ऑस्ट्रियोआर्थराइटिस, टाइप २ डायबिटीज, पित्ताशयाचे आजार, उच्च रक्तदाब, लिवरला सूज येणे, श्वास घेण्यास अडथळा, नर्व डिस्ऑर्डर यासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. यासारखे आजार बळावू नये यासाठी नियमित व्यायामाने वजन नियंत्रणात ठेवू शकता. जोरात चालणे, पोहणे, सायकल चालवणे यासारखे व्यायाम करू शकता. दिवसांतून तीन वेळा नियमित आहार घ्या. काही लोक भूक लागण्यावर कोणत्याही वेळी खातात. वेळ न पाहता गोड पदार्थ आणि फास्ट फूड खातात. त्यामुळे लठ्ठपणा वाढीस लागतो. कमी कॅलरीयुक्त आहार, फळं, भाज्या, कडधान्यांचे सेवन करा. मिठाई, अल्कोहलचे सेवन अगदी कमी प्रमाणात करा. अतिरिक्त चरबी वाढवणारे पदार्थ खाण्यापासून लांब राहा. दिवसभरात आवश्यक तेवढे पाणी प्या. काकडी, लिंबू, आलं, पुदिन्याचा रस वजन कमी करण्यास मदत करतात. विशेषतः पोटातील फॅट कमी करण्यास या फळांचा रस फायदेशीर ठरतो. फॅट कमी करण्यासाठी ग्रीन टी, दही, डाळी, ओट्स, अंडी अशा पदार्थांचे सेवनही लाभदायक ठरते.

## कच्च्या केळ्याचे सेवन अनेक विकारांवर उपयुक्त

**पिकलेली** केळी आपल्या आहारामध्ये नेहमीच समाविष्ट असून, या फळाचे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने असणारे फायदे आपल्या परिचयाचे आहेत. पोटॅशियम आणि क्षार मुबलक असणारे हे फळ पचण्यास हलके आहे. याच्या सेवनाने शरीरामध्ये त्वरित ऊर्जा उत्पन्न होत असते. म्हणूनच व्यायामापूर्वी एखादे केळे खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देत असतात. पिकलेल्या केळ्यांप्रमाणे कच्चे केळे देखील भाजी, भजी, कोफ्ते इत्यादी पदार्थ बनवण्याकरिता वापरले जात असते. पिकलेल्या केळ्यांप्रमाणेच कच्च्या केळ्याचे सेवनही आरोग्याच्या दृष्टीने अतिशय फायदेशीर म्हटले जाते. कच्च्या केळ्यांमध्ये फायबर आणि हेल्दी स्टार्च असून, ही तत्त्वे आतड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे 'ब्लॉकेज' उत्पन्न होऊ देत नाहीत. त्याचमुळे ज्यांना बद्धकोष्ठाचा त्रास आहे, त्यांनी कच्च्या केळ्यांचा समावेश आहारामध्ये अवश्य करावा. ज्यांना मधुमेह आहे, किंवा ज्यांना मधुमेह असल्याचे नुकतेच निदान झाले आहे, त्यांच्यासाठी कच्च्या केळ्याचे सेवन फायदेशीर आहे. याच्या सेवनाने शरीरातील ब्लड-शुगरची पातळी नियंत्रणात राहते. कच्च्या केळ्यामध्ये फायबरची मात्रा मुबलक असून, याच्या सेवनाने पोट अधिक काळ भरलेले राहते व त्यामुळे वारंवार भूक लागण्याची भावना होत नाही. याच्या सेवनाने पचनक्रियाही उत्तम राहते. त्यामुळे ज्यांना वारंवार अपचनाचा त्रास होतो, त्यांनी आपल्या आहारामध्ये कच्च्या केळ्याचा समावेश अवश्य करावा.



### विद्यार्थ्यांचे समायोजन

ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण ८१ अनधिकृत शाळा असून त्यात १९७०८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी त्यांचे इतर अधिकृत शाळांत समायोजन करण्यासाठी ठाणे महापालिका प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना जवळच्या अधिकृत शाळांमध्ये समायोजित करण्याचाही विचार केला जात आहे. त्यास १९ खाजगी शाळांनी तयारी दाखवली असल्याचे सांगळे यांनी स्पष्ट केले. ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत शाळांचा मुद्दा नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित झाला होता. त्यावेळी आमदारांच्या सुचनेनुसार या शाळांची कागदपत्रे तपासून ज्या शाळा नियमात बसू शकतील, तर त्यांना तशी संधी देण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त सौरभ राव यांनी दिले होते. त्यानुसार त्यांनी ज्या अनधिकृत शाळा नियमित होऊ शकतील त्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका महापालिका आयुक्त राव यांनी घेतली आहे. ८१ पैकी ५ शाळांनी त्यादृष्टीने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याचा प्रस्ताव दिला आहे. उर्वरित ७६ शाळांकडून असा कोणताही प्रस्ताव आलेला नाही. त्यांना आणखी एक संधी द्यावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत.

## ठाण्यातील बेकायदा ८१ शाळा चालकांच्या अडचणीत वाढ
# ठाणे महापालिकेने केल्या पोलिसात तक्रारी

■**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत शाळांविरोधात प्रशासनाने कठोर कारवाई करण्यासाठी पाऊले उचलली असून ८१ अनधिकृत शाळांविरोधात पालिका प्रशासनाने पोलिस ठाण्यात तक्रारी दिल्या आहे. यानुसार,६८ शाळांवर गुन्हे दाखल तर, १३ शाळांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू झाली आहे. याशिवाय, या शाळांची नळ जोडणी खंडित करण्यात आली असून शाळांच्या बांधकामावर अतिक्रमण विभागाकडूनही कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामुळे या शाळा चालकांच्या अडचणीत वाढ झाल्याचे चित्र आहे.




ठाणे महापालिका क्षेत्रात बेकायदेशीरपणे शाळा सुरू असल्याची बाब काही वर्षांपुर्वी पुढे आली होती. या शाळांना महापालिकेकडून सातत्याने नोटीसा बजावण्यात येत आहेत. तरीही संस्था चालक शाळा सुरूच ठेवत असल्याचे चित्र आहे. या मुद्द्यावरून पालिका प्रशासनावर टिका होत होती. दरम्यान, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अनधिृकत शाळांच्या स्थितीचा नुकताच आढावा घेतला. त्यात या शाळांची नोंदणी नाही. काही अनधिकृत शाळा अनधिकृत इमारतीत आहेत. काही अनधिकृत शाळा निवासी इमारतीत भाड्याच्या जागेत सुरू आहेत, अशी माहिती उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे यांनी दिली. या सर्व अनधिकृत शाळांची यादी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच, शिक्षण हक्क कायद्यानुसार या अनधिकृत शाळांना ५२ कोटी रुपयांचा दंडही करण्यात आल्याचेही उपायुक्त सांगळे यांनी सांगितले. अनधिकृत शाळांपैकी सर्वात जास्त शाळांची संख्या दिवा प्रभाग समिती क्षेत्रात आहेत. त्या अनुषंगाने दिवा प्रभाग समितीने या अनधिकृत शाळांविरुद्ध कार्यवाही सुरू केलेली आहे. आतापर्यंत ३२ अनधिकृत शाळांची नळ जोडणी पालिकेने खंडित केली आहे. या अनधिकृत शाळांच्या बाबतीत शहर विकास विभागाकडील अनधिकृत बांधकामाच्या यादीनुसार अतिक्रमण विभागाकडूनही कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे, अशी माहिती पालिका प्रशासनाने दिली.

**अनधिकृत शाळा**

● **प्रभाग - शाळा संख्या - विद्यार्थी संख्या**
- दिवा - ६५ - १६४३७
- मुंब्रा - ८ - १८२६
- माजिवडा - मानपाडा - ३ - ५६२
- कळवा - ३ - ४१५
- उथळसर - २ - ४६८
- एकूण – ८१ – १९७०८

## सिमेंट मिक्सर वाहनातून अवैध मद्याची वाहतूक
# मद्याच्या बाटल्यांनी भरलेले ५९५ खोके जप्त

■**ठाणे** : गोवा राज्यातून निर्मित अवैध मद्याची वाहतुक चक्क सिमेंट मिक्सर वाहनातून करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत पथकाने अवैध मद्याच्या बाटल्यांनी भरलेले ५९५ खोके जप्त केले आहेत. या प्रकरणी वाहन चालक मोहन जोशी याला अटक केली आहे.



गोवा राज्यात निर्मित मद्याला राज्यात बंदी आहे. असे असतानाही हा मद्याचा साठा छुप्या पद्धतीने राज्यात आणला जात असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ठाणे, नवी मुंबई आणि कल्याण पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, पथकांनी सीबीडी -डी. वाय. पाटील स्टेडियमच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील घाट रस्त्यात मंगळवारी मध्यरात्री गस्त घातली. पथकांची गस्ती सुरू असतानाच १० चाकी सिमेंट मिक्सर हे वाहन संशयास्पदरित्या येत असल्याचे पथकाला आढळून आले. त्यानंतर पथकाने ते वाहन अडविले. त्या वाहनाची पथकाने तपासणी सुरू केली. त्यावेळी वाहनाच्या मधील बाजूस असलेल्या मिक्सरचे झाकण उघडले असता, त्यामध्ये गोवा राज्यात निर्मित अवैध मद्याचा साठा आढळून आला.

पथकाने वाहन ताब्यात घेतले. या वाहनातून अवैध मद्याच्या बाटल्या भरलेले एकूण ५९५ खोके आढळून आले. दारुबंदी गुन्ह्यांतर्गत पथकाने वाहन जप्त केले. वाहनासह हा एकूण ६६ लाख ३९ हजार १७५ रुपयांचा मुद्देमाल असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले. याप्रकरणाचा पुढील तपास ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक प्रवीण तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाचे निरीक्षक महेश धनशेट्टी करत आहेत.

# बदलापुरात मराठी पाट्यांवरून मनसे आक्रमक
## मराठी भाषादिनी मराठी पाट्या न दिसल्यास काळे फासणार

■**बदलापूर** : बदलापुरात नव्याने सुरू करण्यात आलेल्या आणि काही जुन्या दुकानांवर अद्यापही मराठी पाट्या लावलेल्या नाहीत. मराठी पाट्यांच्या या मुद्द्यावर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या बदलापूर शाखेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. मराठी भाषादिनानिमित्त पाट्या मराठी न केल्यास त्या पाट्यांना काळे फासले जाईल, असा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.

बदलापुरात सध्या कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या वतीने अतिक्रमणांवर कारवाई करत रस्ते आणि पदपथ मोकळे केले जात आहेत. एकीकडे ही कारवाई सुरू असताना दुसरीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मराठी पाट्यांच्या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेण्यास सुरूवात केली आहे. नुकतेच मनसेच्या वतीने शहरातील दुकानांमध्ये धडक दिली. यावेळी बदलापुरातील दुकानांवर असलेल्या मराठी पाट्यांच्या मुद्द्यावरून मनसैनिक आणि दुकानदारांमध्ये जोरदार




वाद झाले. याच मुद्द्यावरून मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने त्यापूर्वी दुकाने आणि आस्थापनच्या पाट्या मराठीत करण्यासाठी मनसेने दुकानदारांना आवाहन केले आहे.

बदलापूर शहरात अनेक दुकाने, आस्थापने आणि खाजगी कार्यालयांवर इंग्रजी भाषेत पाट्या लावण्यात आल्या आहे. या पाट्यांच्या विरूद्ध मनसेच्या महिला आघाडीने आक्रमक भूमिका घेत या दुकानदारांना इशारा दिला आहे. या पाट्या मराठीत करण्यासंदर्भात पत्र देत मराठी भाषा दिनाच्या दिवशी दुकानावर मराठी पाट्या दिसायल्या हव्यात, असे आवाहन मनसैनिकांनी केले आहे. दुकानांच्या पाट्या मराठीत न केल्यास त्यांना काळे फासले जाईल, असा इशारा मनसैनिकांनी यावेळी दिला. यावेळी दुकानदारांसोबत मनसैनिकांचे वादही झाले. यावेळी मनसेच्या महिला आघाडीच्या संगीता चेंदवणकर, नंदा पांढरे, चित्रपट सेनेचे गणेश पिल्लई आणि इतर महिला कार्यकर्ते उपस्थित होते.

# उल्हासनगरात ७० टक्के मालमत्ताधारक थकबाकीदार



■**उल्हासनगर** : उल्हासनगर शहरातील एकूण मालमत्ताधारकांपैकी तब्बल ७० टक्के मालमत्ताधारक थकबाकीदार असल्याची माहिती समोर आली आहे. उल्हासनगर शहरात एकूण मालमत्ताधारकांची संख्या १ लाख ८३ हजार असून त्यातील १ लाख २९ हजार ९२४ मालमत्ताधारक थकबाकीदार आहेत. तर थकबाकीची रक्कमही ९५१ कोटींवर गेली आहे. थकबाकीदारांना करदात्यांमध्ये बदलण्याचे मोठे आव्हान पालिका प्रशासनापुढे आहे. येत्या अभय योजनेत नक्की किती प्रतिसाद मिळतो हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

उल्हासनगर महापालिका आपल्या मालमत्ता कर थकबाकीचे नवनवे विक्रम स्थापन करत आहेत. पालिकेचा कारभार हाकणारे त्या त्या वेळचे आयुक्त याबाबत उघडपणे भूमिका मांडतात. करवसुलीसाठी विविध उपाययोजना राबवतात. मात्र त्याचा काहीएक परिणाम होताना दिसत नाही. उलट दहा वर्षांपूर्वी असलेली पालिकेची मालमत्ता कराची थकबाकी २३९ कोटींवरून थेट ९५१ कोटींवर पोहोचली आहे. त्यामुळे पालिकेची आर्थिक स्थिती खालावते आहे. त्यातच शहरात मालमत्ता कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या वाढत असल्याचे समोर आले आहे.

कर विभागाने दिलेल्या माहितीनुसार उल्हासनगर शहरात एकूण मालमत्ताधारकांची संख्या १ लाख ८३ हजार इतकी आहे. तर मालमत्ता कर थकवणाऱ्या थकबाकीदारांची संख्या १ लाख २९ हजार ९२४ इतकी आहे. याचाच अर्थ एकूण मालमत्ता धारकांपैकी तब्बल ७० टक्के मालमत्ताधारक हे थकबाकीदार आहेत. त्या सर्वांनी ९५१ कोटी १० लाख ७९ हजार ४५८ रुपए इतकी मालमत्ता कराची रक्कम थकवली आहे. विशेष म्हणजे मालमत्ता कराच्या थकबाकीचा हा आका दिवसेंदिवस वाढताच आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने अभय योजनेची घोषणा केली असून थकबाकीसह चालू कराची रक्कम एकरकमी भरल्यास मालमत्ताधारकांची शास्ती माफ केली जाणार आहे.

**थकबाकीचे विक्रम**

उल्हासनगर महापालिकेची २०१४-१५ या आर्थिक वर्षात २३९ कोटी मालमत्ता कराची थकबाकी होती. २०१६-१७ या वर्षात ही थकबाकी २६२ कोटींवर पोहोचली. २०१९ वर्षात ही थकबाकी रक्कम ३८२ कोटी होती. २०२० वर्षात ही थकबाकीची रक्कम ४८६ कोटी, तर २०२१ वर्षात ५४२ कोटींवर गेली. २०२३ वर्षात थकबाकी ५७८ कोटींवर तर गेल्या आर्थिक वर्षात थकबाकीची रक्कम ७८१ कोटींवर पोहोचली होती. यंदाच्या वर्षात ही रक्कम ९५१ कोटी या विक्रमी टप्प्यावर पोहोचली आहे.

**आयुक्तांचे प्रयत्न निष्फळ**

उल्हासनगर महापालिकेची आर्थिक स्थिती खालावत असल्याचे सांगत काही वर्षांपूर्वी तत्कालिन आयुक्त राजेंद्र निंबाळकर यांनी नगरसेवकांच्या निधीला कात्री लावली होती. त्यानंतर आयुक्तपदी आलेल्या सुधाकर देशमुख यांनी थेट महापालिकेची आर्थिक स्थिती विशद करणारी श्वेतपत्रिकाच जाहीर केली. त्यावेळी अनावश्यक विकासकामे टाळण्याचा सल्ला त्यांनी त्यात दिला होता. मात्र देशमुख यांच्यानंतर आलेल्या आयुक्तांनी याकडे साफ दुर्लक्ष केले होते. त्याचवेळी पालिकेची धुरा सांभाळणाऱ्या आयुक्त डॉ. राजा दयानिधी यांनी अवास्तव उत्पन्नाचे इमले बांधत खर्च करणाऱ्या लोकप्रतिनिधींना चाप लावला होता.

## केडीएमसीच्या माजी सहाय्यक आयुक्तांचे निलंबन

■**कल्याण** : कल्याण डोंबिवली मनपाक्षेत्रातील अ प्रभागाचे यापूर्वीचे सहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांना अनधिकृत बांधकाम रोखण्यात अपयशी ठरल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील ६५ इमारतींचा रेरा घोटळा प्रकरणी अनधिकृत बांधकाम प्रश्नावरून न्यायालयाने केडीएमसीला फटकारले आहे. त्यानंतर जागे झालेल्या पालिका प्रशासनाने अनधिकृत बांधकामे पाडण्याच्या धडक कारवाईचा बडगा उगारला आहे. असे असताना देखील अ प्रभागाचे तत्कालीन सहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांच्या कारकिर्दीत अनधिकृत बांधकामे अ प्रभाग क्षेत्रात वाढली. टिटवाळा रिंग रोड लगत इंदिरा नगर, गणेश नगर, बल्याणी, उभर्णी, मोहीली, गाळेगाव, मोहने, अटाळी, आंबिवली, बंदरपाडा, शहाड आदी परिसरात वाढत्या अनधिकृत बांधकामाप्रश्नी तक्रारी पाहता सहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांनी किरकोळ कारवाई करीत एक प्रकारे दुर्लक्ष केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याबाबत केडीएमसी आयुक्त इंदू राणी जाखड यांनी देखील अनाधिकृत बांधकामावर ठोस कारवाई करा अशी समज संदीप रोकडे यांना दिल्याची सूत्रांकडून माहिती मिळाली. परंतु यातून त्यांनी बोध न घेतला नाही. अशातच त्यांची बदली झाली. आणि अखेर अ प्रभागातील अनधिकृत बांधकाम प्रश्नी त्यांच्यावर ठपका ठेवित अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्यासहीनिशी संदीप रोकडे यांच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत.

## कल्याण-डोंबिवलीत ६५ बेकायदा इमारतींचा वाद

■**डोंबिवली** : कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीत ६५ बेकायदा इमारती उभारण्यात आल्या आहेत. या घोटाळ्याचा म्होरक्या म्हणून सुजित नलावडे यांचे नाव पुढे आले आहे. याबाबत ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी मोठा गौप्यस्फोट करत नलावडेवर तातडीने कारवाईची मागणी केली आहे. मात्र, या आरोपांना प्रत्युत्तर देत सुजित नलावडे यांनी म्हात्रेंवर अब्रूनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचे जाहीर केले आहे.

मंगळवारी सायंकाळी उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची भेट घेतली. या भेटीत म्हात्रे यांनी नलावडेवर गंभीर आरोप केले, नलावडे हे सत्ताधारी पक्षाचे असून, त्यांच्यावर दोन गुन्हे दाखल आहेत. रहिवाशांची फसवणूक करणाया व्यक्तींवर आधी कारवाई झाली पाहिजे. हा केवळ नागरिकांनाच नव्हे, तर महापालिका आणि रेरा प्राधिकरणालाही फसवण्याचा प्रकार आहे, असा आरोप म्हात्रे यांनी केला.

**राजकीय सूडबुद्धीने माझ्यावर आरोप–नलावडे**

दीपेश म्हात्रे यांच्या आरोपांवर सुजित नलावडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. माझ्यावर राजकीय सूडबुद्धीने आरोप केले जात आहेत. २०१८ ते २०२० दरम्यान या बेकायदा इमारतींसाठी खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली. त्या वेळी मी तुरुंगात होतो. मग मी जेलमधून या इमारतींसाठी परवानग्या मंजूर केल्या का? ६५ बेकायदा इमारतींचा तपास एसीपी स्तरावरील अधिकार्यांनी केला आहे. त्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे चुकीचे आहे, असे नलावडे यांनी स्पष्ट केले.



**राजकीय संघर्ष पेटण्याची शक्यता**

या संपूर्ण प्रकरणामुळे ठाकरे गट आणि भाजप यांच्यातील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. एकीकडे उद्धवसेनेचे दीपेश म्हात्रे नलावडे यांना अटक करण्याची मागणी करत आहेत, तर दुसरीकडे नलावडे यांनी अब्रूनुकसानीचा दावा दाखल करण्याचा इशारा दिला आहे. आता महापालिका प्रशासन आणि पोलीस या वादाला कसा प्रतिसाद देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**अब्रुनुकसानीचा दावा करणार**

नलावडे यांनी एक गंभीर आरोप करत म्हटले की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मी भाजप उमेदवार रवींद्र चव्हाण यांच्या प्रचारात सक्रिय होतो. त्या वेळी दीपेश म्हात्रे यांच्या भावाने मला भेटून त्यांच्या पक्षाला मदत करण्याची विनंती केली होती. मात्र, मी पक्षविरोधी कृती करणार नाही, असे स्पष्ट सांगितल्याने ते नाराज झाले. त्यानंतर त्यांच्या बंगल्यावर झालेल्या चर्चेत काही राजकीय नेत्यांनी माझ्यावर हल्ला होऊ शकतो, अशी माहिती दिली होती. त्यामुळे पोलिसांनी मला सुरक्षा पुरवली आहे. मी २०२१ साली तुरुंगातून बाहेर आलो आहे. त्यानंतर माझ्यावर कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. तरीही माझी प्रतिमा मलीन करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामुळे मी दीपेश म्हात्रे यांच्यावर अब्रूनुकसानीचा दावा दाखल करणार आहे, असेही नलावडे म्हणाले.

## मालमत्ता कर थकबाकीदार हॉटेल, लॉजवर जप्तीची कारवाई
# पनवेल महापालिका ॲक्शन मोडवर



■**पनवेल** : मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांवर पनवेल महापालिकेने कडक कारवाई सुरू केली आहे. कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता कर न भरणाऱ्या नावडे उपप्रभागातील तळोजा एमआयडीसीमधील कारखान्यावर जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. याचबरोबर कळंबोलीमधील हॉटेल्स, लॉज सील करण्याची कारवाई सुरू केली आहे. थकबाकीदारांना जप्तीपूर्व नोटीसा बजावल्यानंतर सात दिवस दिवस होऊनही कर न भरणाऱ्यांना वॉरंट नोटीसा बजावल्या जातात. त्यानंतरही कर न भरणाऱ्या मालमत्ता सील करणे तसेच जप्तीची कारवाई केली जाते. पनवेल महापालिका हद्दीतील चार विभागातील ४४७ मालमत्तांना जप्तीपूर्वीच्या नोटीसा आणि २७ थकबाकीदारांना वॉरंट नोटीसा यापूर्वच बजावल्या आहेत. त्यामुळे मालमत्ता कर थकबाकीदार धास्तावले आहेत. मालमत्ता कर भरण्यासाठी पनवेल महापालिकेने सातत्याने रहिवाशांना आवाहन केले आहे. त्यानंतही कर न भरणाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे. उपायुक्त स्वरुप खारगे आणि कर अधीक्षक महेश गायकवाड तसेच कर अधीक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली जप्ती कारवाई आणि वसुली कारवाईसाठी मनुष्यबळ वाढवण्यात येत आहे. वसुली कारवाईला गती देण्यासाठी लवकरच वसुली टीम मोठी करण्यात येणार आहे. मालमत्ता कर न भरल्यास त्याना दरमहा २ टक्के दंड आकारला जातो. दरम्यान, लोकांच्या मनातील शंका दूर झाल्याने आता लोक स्वताहून कर भरण्यासाठी पुढे येत आहे. त्यामुळे मालमत्ता कराच्या भरण्यामध्ये भरघोस वाढ होताना दिसत आहे. पनवेल महापालिका हद्दीत साडेतीन लाख निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक नोंदणीकृत मालमत्ता आहेत.

## वैभव गायकवाड यांचे नाव पुरवणी आरोपपत्रातून वगळले

■**कल्याण** : कल्याण पूवेर्तील भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांनी माजी शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर गेल्या वर्षी हिललाईन पोलीस ठाण्यात गोळीबार केला होता. या गोळीबार प्रकरणातील गुन्ह्यात गणपत गायकवाड यांच्यासह एकूण सात आरोपींमध्ये वैभव गायकवाड यांचेही नाव तक्रारदाराकडून घेण्यात आले होते. या गोळीबार प्रकरणानंतर वैभव फरार होते. आता उल्हासनगर न्यायालयात पोलिसांकडून दाखल करण्यात आलेल्या पुरवणी आरोपपत्रातून वैभव यांचे नाव वगळण्यात आले आहे. त्यांच्या विरुध्द कोणताही सहभागाचा पुरावा आढळून आला नसल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकाराने अस्वस्थ झालेल्या शिवसेनचे माजी शहरप्रमुख महेश गायकवाड यांनी पोलिसांनी वैभव गायकवाड यांना पुरवणी आरोपपत्रातून वगळले असेल तर आपण याप्रकरणी उच्च न्यायालयात दाद मागु, असा इशारा माध्यमांशी बोलताना दिला आहे. जमिनीच्या वादातून गेल्या वर्षी उल्हासनगरमधील हिललाईन पोलीस ठाण्यात भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे शिवसेनेचे माजी शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला होता. या गोळीबार प्रकरणात एकूण सात जणांवर हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव यांचाही समावेश तक्रारदाराकडून गुन्ह्यात करण्यात आला होता. या गोळीबार प्रकरणामुळे गणपत गायकवाड आणि इतर दोन जण तुरुंगात आहेत. चार जण जामिनावर बाहेर आले आहेत. गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव हे प्रकरण घडल्यापासून फरार होता. वैभवच्या अटकेसाठी महेश गायकवाड यांनी पोलिसांना अनेक निवेदने दिली आहेत. पोलिसांनी या गोळीबारप्रकरणीचे आरोपपत्र उल्हासनगर न्यायालयात यापूर्वीच दाखल केले आहे. आता पुरवणी आरोपपत्रातून वैभव गायकवाड यांचे नाव वगळण्यात आले आहे.

## लाचेप्रकरणी पीएसआय ताब्यात, आरोपी करु नये यासाठी मागितली इतकी लाच

■**ठाणे** : भिवंडी येथील कोनगाव पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) राजेश डोंगरे (३४) याला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने (एसीबी) १० हजार रुपयांची लाच घेताना ताब्यात घेतले आहे. हत्येच्या प्रयत्न प्रकरणी दाखल गुन्ह्यात आरोपी करू नये यासाठी त्याने तक्रारदाराकडून लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले आहे. राजेश डोंगरे विरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोनगाव पोलीस ठाण्यात राजेश डोंगरे हे पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत आहेत. कोनगाव पोलीस ठाण्यात हत्येच्या प्रयत्न प्रकरणात एक गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणातील एकाला आरोपी करु नये यासाठी डोंगरे याने त्यांच्याकडून ८० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तडजोडीअंती २५ हजार रुपये देण्याचे ठरले होते. अखेर त्यांनी याप्रकरणी तक्रार देण्यासाठी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. त्यांनी राजेश डोंगरे याच्याविरोधात तक्रार दाखल केली. दरम्यान, शनिवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता, डोंगरे याने १० हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानंतर तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून राजेश डोंगरे याला १० हजार रुपये घेताना ताब्यात घेतले. याप्रकरणाची नोंद कोनगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

ठाणे, कोकण पट्ट्यात मागील वर्षभरात लाचखोरीमध्ये सर्वाधिक कारवाई पोलिसांवर झाली आहे. ठाणे लाचलुपत प्रतिबंधक विभागाने १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत रचलेल्या सापळ्यांमध्ये ठाण्यासह कोकण क्षेत्रातील २१ पोलीस अधिकारी आणि कर्मचारी सापळ्यात अडकले होते. त्यापाठोपाठ महसूल, पालिकेतील कर्मचाऱ्यांचेही लाच घेण्याचे प्रमाण अधिक असल्याचे कारवाईतून स्पष्ट झाले आहे. लाच घेणे आणि देणे दोन्ही गुन्हे असतानाही ठाणे, पालघर आणि तळ कोकणामध्ये लाचेचा विळखा शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये घट्ट पकडला आहे. त्यातही लाच घेण्यामध्ये पोलीस अव्वल ठरल्याचे कारवाईतून आढळून आले आहे.

कारवाई टाळण्यासाठी, जामीन मिळवून देणे, अटक करु नये अशा विविध कारणांसाठी पोलिसांनी लाच मागितल्याचे समोर आले आहे. २०२४ मध्ये ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एकूण ६६ सापळे रचले होते. त्यामध्ये ९८ जणांविरोधात गुन्हे दाखल झाले. या सापळ्यांमध्ये सर्वाधिक कारवाया पोलिसांविरोधात झाल्या आहेत. ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या परिक्षेत्रात ठाणे, नवी मुंबई, पालघर, रायगड-अलिबाग, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हा भाग येतो. या क्षेत्रांत ग्रामीण आणि शहरी पोलीस असा दोन्ही भाग येतो. विभागाच्या कारवाईत एकूण २१ पोलिसांवर लाचखोरीचे गुन्हे दाखल झाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००० १४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com